



पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३७ ■ शनिवार, दि. ७ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# इराणवर आज रात्री सर्वात मोठा हल्ला


प्रतिनिधी ७ मार्च

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसंट यांनी फॉक्स न्यूजशी बोलताना सांगितले की, इराणवर आज रात्रीचा सर्वात मोठा हल्ला केला जाईल. त्यांनी सांगितले की या हल्ल्याचा उद्देश इराणच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपकांना आणि क्षेपणास्त्र निर्मिती कारखान्यांना लक्षणीय नुकसान पोहोचवणे आहे. त्यांनी सांगितले की या कारवाईमुळे इराणची क्षेपणास्त्र क्षमता लक्षणीयरीत्या कमकुवत होईल.

आज अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धाचा आठवा दिवस आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने इस्त्रायलला सुमारे १५१.८ दशलक्ष डॉलर्स किमतीची शस्त्रे आणि लष्करी मदत विकण्यास मान्यता दिली आहे. परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी सांगितले की, आणीबाणीच्या काळात लष्करी उपकरणांची तात्काळ विक्री करणे आवश्यक होते. इस्त्रायली मीडिया आउटलेट विनीतच्या मते, या आपत्कालीन पॅकेजमध्ये १२००० बीएलयू-११०ए/बी बॉम्ब, लॉजिस्टिक सपोर्ट आणि इतर सपोर्ट सेवांचा समावेश आहे. दरम्यान, रशिया युद्धादरम्यान इराणला गुप्तचर मदत देत असल्याचे वृत्त आहे. मॉस्कोने इराणला मध्य पूर्वेतील अमेरिकन युद्धनौका आणि लष्करी विमानांच्या ठिकाणांबद्दल माहिती पुरवली आहे. वॉशिंग्टन पोस्टने तीन अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की रशिया इराणला लक्ष्यीकरण करणारी गुप्तचर माहिती पुरवत आहे ज्यामुळे ते अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य करू शकेल.

## अमेरिकेची थेट धमकी





### इराणने क्षेपणास्त्रांचा एक नवीन लॉट डागला

इस्त्रायली लष्कराने सांगितले की, इराणकडून नवीन क्षेपणास्त्रे डागण्यात आली आहेत. लष्कराच्या मते, या क्षेपणास्त्रांना रोखण्यासाठी देशाची हवाई संरक्षण प्रणाली सक्रिय करण्यात आली आहे. इस्त्रायली लष्कराने म्हटले की, धोका असलेल्या भागातील रहिवाशांना मोबाईल फोन अलर्ट पाठवण्यात आले आहेत.

### १२ मार्चला इराण-इस्त्रायल युद्ध थांबणार?

युद्धाचे पडसाद जगासह भारतावरही उमटू लागले आहेत. कच्च्या तेलाचा पुरवठा कमी झाला असून, गॅसच्या किमतीत वाढ झाली आहे. हे युद्ध कधी थांबणार, असा प्रश्न सर्व जगाला पडला आहे. 'इराणने विनाअट शरणागती पत्करल्याशिवाय कोणताही करार होणार नाही' अशी पोस्ट ट्रम्प यांनी ६ मार्चला केली आहे. त्यानुसार जुन्या पॅटर्नचा विचार केल्या सहा दिवसानंतर म्हणजे १२ मार्चला या भीषण युद्धाच्या समाप्तीचे संकेत मिळत असल्याचे मानले जात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या प्लॅटफॉर्मवरून संकेत दिले आहेत.

### इस्त्रायल-इराण युद्धाशी संबंधित घडामोडी

ट्रम्पने अयातुल्ला अली खामेनी यांचा मुलगा मोजतबा यांना त्यांचा उत्तराधिकारी म्हणून मान्यता देण्यास नकार दिला. अमेरिका-इस्त्रायल हल्ल्यांमध्ये इराणमध्ये १३३२ जण ठार झाले. इराणमध्ये १३०० हल्ले, १४ वैद्यकीय केंद्रांना लक्ष्य केले. इराणच्या अनेक भागात पाणी आणि वीजपुरवठा खंडित झाला. ३०० इराणी क्षेपणास्त्र प्रक्षेपक नष्ट केले. इराणचा दावा आहे की, कुवेत, बहरीन आणि युएईमधील २० अमेरिकन तळांना नुकसान झाले आहे.

# शेतकऱ्यांचे दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ!

♦ अर्थसंकल्पात मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

प्रतिनिधी ७ मार्च



**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी मांडलेल्या अर्थसंकल्पात जाहिर केली. याचा जिल्ह्यातील जवळपास ९० हजार ६८८ शेतकऱ्यांना होण्याची शक्यता आहे. कारण यांच्याकडे १ हजार ६९ कोटी ६४ लाख रूपयांचे पीककर्ज थकीत आहे. मात्र यातील पात्र शेतकरी कोणते ही कर्जमाफी योजनेच्या अटी व शर्तीनंतरच निश्चित होणार आहे.

कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन रक्कम दिली जाईल, असेही त्यांनी जाहीर केले. विधानपरिषदेत वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी अर्थसंकल्प मांडला. शेतकरी सातत्याने कर्जबाजारी होऊ नये म्हणून अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'मित्रा' या शासकीय संस्थेचे अध्यक्ष प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती.

### पात्र शेतकरी कोण? याबाबत सध्या मौन

◆ दोन लाखांपर्यंतच्या कर्जमाफीचे पात्र शेतकरी कोण असतील हे स्पष्ट केलेले नाही. त्यासाठीचा आदेश लवकरच काढला जाईल. मात्र, याआधीच्या कर्जमाफीच्या लाभासाठी आमदार, खासदार, मंत्री, नगरसेवक, जिल्हा परिषदांचे पदाधिकारी, सदस्य हे पात्र नव्हते. शासकीय तिजोरीतून वेतन घेणारेही अपात्र ठरविण्यात आले होते. तसेच प्राप्तिकर भरणाऱ्यांनाही लाभ देण्यात आला नव्हता.

### जिल्ह्यात ९० हजार ६८८ शेतकरी कर्जबाजारी

जिल्ह्यात सप्टेंबर २०२५ पर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँका, खासगी व्यापारी बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखांमधून ९० हजार ६८८ शेतकऱ्यांनी जवळपास १ हजार ६९ कोटी ६४ लाख रूपयांचे कर्ज घेतलेले आहे, अशी माहिती जिल्हा अग्रणी बँकेच्या सूत्रांनी दिली आहे. तसेच कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ५० हजार रूपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ मिळणार आहे.

# पातूरच्या रेणुका केकन हिचे यूपीएससीत दैदिप्यमान यश

♦ तालुक्यातील पहिली आयएएस मुलगी ठरली

प्रतिनिधी ७ मार्च



**पातूर :** शहरातील रेणुका दिनेश केकन हिने यूपीएससी स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पातूर तालुक्याचा नावलौकिक वाढवला आहे. विशेष म्हणजे पातूर तालुक्यातून यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होणारी ती पहिली मुलगी ठरली असून तिच्या या यशामुळे शहरासह संपूर्ण तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. रेणुका केकन या पातूर येथील रहिवासी असून त्यांचे वडील दिनेश केकन हे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक आहेत, तर आई शोभा दिनेश केकन या गृहिणी आहेत. साध्या व शैक्षणिक वातावरण असलेल्या कुटुंबातून पुढे येत रेणुकाने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर हे मोठे यश मिळवले आहे. तिच्या कुटुंबात तिला एक लहान बहीण देखील आहे. रेणुकाचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, आरिफ नगर पातूर येथे झाले. लहानपणापासूनच अभ्यासू आणि जिद्दी स्वभावाची असलेल्या रेणुकाने शालेय जीवनातच आपली गुणवत्ता दाखवून दिली होती. त्यानंतर पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण तुळसाबाई कावल विद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर UPSC परीक्षा उत्तीर्ण होण्याचा ध्यास घेत रेणुकाने अभ्यासाला सुरुवात केली. विशेष म्हणजे कोणताही क्लास न लावता सेल्फ स्टडी आणि ऑनलाइन माध्यमातून तयारी करत तिने ळझएण परीक्षेची तयारी केली. अखेर तिसऱ्या प्रयत्नात रेणुका यशस्वी ठरली. पातूर तालुक्यातील पहीली आयएएस अधिकारी होण्याचा मान मिळाला आहे.




# इराण-इस्त्राइल-अमेरिका युद्धाची सर्वसामान्यांनाही धग!

♦ गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ, डिझेल-पेट्रोलच्याही किमती वाढण्याची शक्यता

प्रतिनिधी ७ मार्च

**अकोला :** सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा एकदा कात्री लागली आहे. ७ मार्च, शनिवारपासून घरगुती आणि व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत मोठी वाढ करण्यात आली आहे. १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची, तर १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या दरात ११५ रुपयांची दरवाढ करण्यात आली आहे. एप्रिल २०२५ नंतर पहिल्यांदाच गॅसच्या किमतीत इतकी मोठी वाढ झाली आहे. तसेच डिझेल-पेट्रोलच्या दरातही वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे पेट्रालपंपांवर रांगा लागल्याचे दिसून येत आहे. इराण-इस्त्राइल-अमेरिका युद्धाची धग आता अकोल्यापर्यंत पोहोचली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून स्थिर असलेल्या गॅसच्या किमती अचानक वाढल्याने गृहिणींचे बजेट कोलमडणार आहे. नवीन दर आजपासूनच लागू झाले आहेत. सर्वच ठिकाणी या किमती वाढल्या असून स्थानिक टॅक्सनुसार ही किंमत थोडीफार वेगळी असू शकते. केवळ घरगुतीच नाही, तर १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या दरातही वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. घरगुती गॅस सिलिंडर ८५२.५० रुपयांवरून आता ९१२.५० रुपये तर १९ किलोच्या कमर्शियल सिलिंडरच्या किमतीत ११५ रुपयांनी वाढ होऊन ती १८३५ रुपये इतकी वाढली आहे. हॉटेल व्यावसायिक आणि छोट्या खाद्य विक्रेत्यांना याचा मोठा फटका बसणार असून, परिणामी बाहेरचे खाणेही महाग होऊ शकते.

युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल डिझेलचे भाव वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पेट्रोल पंपावर सध्या धास्तीचे वातावरण आहे. अनेक पंप चालकांना कंपन्यांकडून आगाऊ रक्कम देण्याच्या सूचना धडकल्या आहेत. युद्धामुळे येणाऱ्या दिवसांमध्ये पेट्रोल डिझेलचे भाव वाढतील अशी शक्यता वर्तवली जात आहे. सध्या पेट्रोल १०४.७७ रुपये प्रति लिटर तर डिझेल ९१.२८ रुपये प्रति लिटर आहे.

### सिलिंडर कालावधी १५ दिवसांवरून २१ दिवसांवर!

◆ युद्धाच्या पार्श्वभूमीवर दोन सिलिंडर घेण्यामधील कालावधी १५ दिवसांवरून २१ दिवसांवर आला आहे. शासनाने नव्या मार्गदर्शक सूचना दिल्या असून नियम लागू होतील. पण या नव्या नियमांमुळे काही कुटुंबांना अडचण निर्माण झाली असून या नियमात सवलत द्यावी अशी गॅस सिलेंडर एजन्सीची मागणी आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका असे आवाहन गॅस वितरण संघटनेने नागरिकांना केले आहे.

### एलपीजीचा व्यावसायीक गॅसपुरवठा थांबवला

◆ केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडरचा पुरवठा तात्पुरता थांबवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे देशभरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि फूड इंडस्ट्रीसमोर मोठे संकट निर्माण झाले असून पुढील काही दिवसांत हा उद्योग ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# लाडकी बहीण योजनाबाबत घोषणा!

प्रतिनिधी ७ मार्च

**मुंबई :** विधानसभेत महाराष्ट्र राज्याचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा अर्थसंकल्प मांडला. मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात लाडकी बहिण योजनाबाबत मोठी घोषणा केली. त्यांनी स्पष्ट केले की, ही योजना यापुढेही सुरू राहणार असून योजनेकरिता आवश्यक भरीव तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री म्हणाले, '८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातील सर्व लाडक्या बहिणींना शुभेच्छा. काळजी करू नका, तुमच्या मनातील प्रत्येक गोष्ट आम्ही पूर्ण करतोय. फक्त योजनेच्या विरोधासाठी कोर्टात जाऊ नका.' फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान हेही सांगितले की, सरकार लाडकी बहिण योजनेच्या सर्व लाभार्थ्यांसाठी तत्पर राहणार आहे.


## CLASSIFIED

### प्लॉट प्लॉट प्लॉट

नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या
३ सोप्या किस्ती ११ महिने
मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

### फ्लॅट फ्लॅट फ्लॅट

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278


# आता 16 वर्षाखालील मुलांना वापरता येणार नाही सोशल मीडिया!

♦ कर्नाटक-आंध्र प्रदेशात बंदी, १६ व १३ वर्षे वयोगटांसाठी सक्ती नियम

प्रतिनिधी ७ मार्च



**बंगळुरू :** कर्नाटक व आंध्र प्रदेश सरकार लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालणार आहे. कर्नाटकात १६ वर्षांखालील तर आंध्रात १३ वर्षांखालील मुलांसाठी ही बंदी लागू असणार आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी अर्थसंकल्पीय भाषणात ही घोषणा केली. मुलांचे मानसिक आरोग्य, नवीन काही शिकण्याच्या क्षमता आणि त्यात लागलेले डिजिटल व्यसन लक्षात घेता कठोर नियम अत्यावश्यक असल्याचे ते म्हणाले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि वाढता स्क्रीन टाईम मुलांच्या वर्तनावर, लक्ष केंद्रित करण्याच्या क्षमतेवर आणि सुरक्षिततेवर गंभीर परिणाम करत आहेत. त्यासाठी १६ वर्षांखालील मुलांसाठी हा नियम केला जाणार आहे. अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावरील संभाव्य निर्बंध व मर्यादा या मुलांचा मोबाईल फोन वापर आणि स्क्रीनटाईमचा नकारात्मक प्रभाव कमी करण्यासाठी असल्याचे सरकारचे स्पष्टीकरण. अल्पवयीन मुलांना सोशल मीडियाच्या वाईट व्यसनापासून दूर ठेवणे हा प्रमुख उद्देश असून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) किंवा सोशल मीडियाचा वापर जबाबदारपणे केला जावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. विधानसभेत बोलताना मुख्यमंत्री नायडू म्हणाले, ही बंदी १३ ऐवजी १६ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी लागू करावी काय, यावर चर्चा सुरू आहे. तोवर १३ वर्षांपर्यंतची मुले कोणत्याही परिस्थिती सोशल मीडियावर वापरणार नाहीत यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. जगात सर्वप्रथम २०२५ साली ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घातली होती.

### ९० दिवसांच्या आत बंदी!

◆ आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी १३ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर ९० दिवसांच्या आत बंदी घालण्याची घोषणा केली आहे. याबाबत वाढत्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेश सरकारने मुलांचा सोशल मीडिया वापर रोखण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या आहेत.



सिटी न्यूज अमरावती
शनिवार, दि. ७ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## ९ मार्च रोजी, विभागीय महिला लोकशाही दिन

**अमरावती:** विभागीय महिला लोकशाही दिन येत्या सोमवारी, ९ मार्च रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११ वाजता आयेजित करण्यात आला आहे, असे विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास, अमरावती विभाग) अब्दुल चौधरी यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे. महिला व बाल विकास विभागाच्या दि. ४ मार्च २०१३ च्या शासन निर्णया नुसार समस्याग्रस्त पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्याकरीता व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवून न्याय मिळावा यादृष्टीने महिलांच्या तक्रारी / अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवून समाजातील समस्याग्रस्त / पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणुन महिला लोकशाही दिन प्रत्येक महिण्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्त स्तरावर, तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय व दर महिण्याच्या चौथ्या सोमवारी तालुका स्तरावर तहसिल कार्यालय या ठिकाणी घेण्यात येते.

# अमरावती रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी बजेटमध्ये १२५.३७ कोटींची तरतूद

♦ अमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावे अमरावती येथे शैक्षणिक ♦संकुल वर्ष २०२६-२७ चा अर्थसंकल्प मांडत असतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

प्रतिनिधी ७ मार्च





**अमरावती :** राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी ०६ मार्च रोजी अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये वर्ष २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये अमरावती रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी बजेटमध्ये १२५.३७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच अमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावे अमरावती येथे शैक्षणिक संकुलाबाबत बजेटमध्ये घोषणा करण्यात आली. अमरावती विमानतळाच्या विस्तारित कामांसंदर्भातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली. राज्याचा अर्थसंकल्प मांडत असतांना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी अमरावतीसाठी बजेट मध्ये भरीव तरतूद केल्याबद्दल आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी मुख्यमंत्री ना.देवेन्द्रजी फडणवीस यांचे मानले आभार अभिनंदन केले आहे.

गेल्या सहा महिन्यापासून अमरावती मधील रेल्वे उड्डाणपुल सर्वच प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याने शहरात वाहतूक व रहदारीची मोठी कोंडी निर्माण झाल्याने नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अमरावतीकरांची रहदारीची समस्या दूर करण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतूक सुलभ करण्यासाठी शासनाने रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी तात्काळ निधी देऊन विहित मुदतीत व गुणवत्तापूर्वक पद्धतीने उड्डाणपुलाचे पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे जुन्या अस्तित्वातील रेल्वे उड्डाण पूलाच्या जागी नवीन रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकामासाठी १२५.३७ कोटींचा निधी लागणार असल्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर रेल्वे उड्डाणपुलाच्या कामास गती देण्यासाठी शासनाने बजेटमध्ये निधी उपलब्ध करण्याची मागणी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी गेल्या २५ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांची भेट घेऊन पत्र सादर केले असता यावर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी संमती दर्शविली.

अशातच राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांनी आज ०६ मार्च रोजी अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये वर्ष २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये अमरावती रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी बजेटमध्ये १२५.३७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रात अमूल्य व अतुलनीय योगदान देणारे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा उचित गुणगौरव करण्याचे दृष्टीने अमरावती येथेअमरावती येथील विभागीय शिक्षण उपसंचालक, कार्यालयाच्या परिसरात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने नविन सुसज्ज प्रशासकीय इमारत साकारून शैक्षणिक संकुलाची उभारणी करण्याबाबत आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी मुख्यमंत्री ना.देवेन्द्रजी फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली . आज मांडल्यात आलेल्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी बजेटमध्ये १२५.३७ कोटींची तरतूद केली आहे. तसेच अमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावे अमरावती येथे शैक्षणिक संकुलाबाबत बजेटमध्ये घोषणा करण्यात आली. अमरावती विमानतळाच्या विस्तारित कामांसंदर्भातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली. राज्याचा अर्थसंकल्प मांडत असतांना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी अमरावतीसाठी बजेट मध्ये भरीव तरतूद केल्याबद्दल आ. सुलभाताई संजय खोडके यांनी मुख्यमंत्री ना.देवेन्द्र फडणवीस यांचे मानले आभार अभिनंदन केले आहे.



टरबुजांची वाहतूक करणाऱ्या धावत्या ट्रक मध्ये टरबुजाच्या गंजीवर बसून जीव घेणा प्रवास.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त निघाली भव्य शोभायात्रा

प्रतिनिधी ७ मार्च

**दर्यापूर:** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तर्फे दरवर्षी तिथी प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्त दर्यापूर शहरातून भव्य शोभायात्रा चे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सांप्रदायिक दिंडी, डिजे वर छत्रपती शिवाजी महाराज यांचे गीत लाऊन त्यांच्या बद्दल गौरव करण्यात आला. विशेषत: आपल्या समाजातील समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, ए पी जे अब्दुल कलाम, वस्ताद लहुजी साळवे, ज्योतिबा फुले यांच्या कार्यकाळात त्यांच्या सोबत काम करणारे हिंदू खाटीक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड, बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमा ट्रॅक्टर वर लाऊन त्यांच्या कार्याचा उजाळा करण्यात आला. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हार



अर्पण करून भव्य मिरवणूकीची सुरुवात करण्यात आली. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, शिवसेना जिंदाबाद अशा गगनचुंबी घोषणा देण्यात आल्या फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली.

या वेळी आमदार गजानन लवटे, युवासेना जिल्हा प्रमुख अंकुश पाटील कावडकर, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती २०२६ चे अध्यक्ष बबनराव विल्हेकर, सचिव प्रदीप वडतकर, तालुका प्रमुख प्रमोद धानोरकर, निलेश पारडे, गुणवंत गावंडे, किशोर टाले, मोहन बायस्कर, सागर गिरहे, रुपेश मोरे, सतीश साखरे, भास्कर थोटे, निलेश होले, अमोल गावंडे, नितेश गावंडे, गोपाल अग्रवाल, दीपक बगाडे, अमोल अरबट, संजय कोरडे, हरिदास ठाकरे, शरद गावंडे, शादाब सुपी, अमन पटेल, संदीप धर्माळे, प्रशांत धर्माळे, सतीश जामनिक, सुनील पाचडे, मोहन खरबडकार, शुभम विल्हेकर, आशिष लायडे, पंकज राणे, राज गुजराती, करण चक्रे, राजू मानकर, विलास गिरहे, रमेश बुंदिले, भगवान उटाळे, प्रवीण पारडे, गौरव आवारे, कुलदीप चौधरी, वेदांत साखरे, संदीप शेळके, अंकुश साबळे, शरद आठवले, मंगेश पारडे, दत्ता लाजुरकर, संतोष हागे, प्रवीण बायस्कर, मंगेश धुराटे, खंडू राऊत, सौरभ वायझाळे तसेच हजारोंच्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणातील आरोपीची उच्च न्यायालयातून निर्दोष सुटका

प्रतिनिधी ७ मार्च

♦ ॲड. सपना जाधव ह्यांची सफल पैरवी

**अमरावती :** अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणातील आरोपींची उच्च न्यायालयाने निर्दोष सुटका केली असून एडवोकेट सपना जाधव यांनी सफल पैरवी केली आहे.

तक्रारकरती हि जुनिवास्ती बडनेरा येथील रहिवासी असून तिला १० वर्षाची लहान मुलगी आहे, तक्रार कर्ती हि दि ११/९/२०२० रोजी सकाळी ११ वाजता कामावर मुलीला जाऊ च्या घरी सोडून गेली, जेव्हा ती कामावरून परत आली तेव्हा पीडित मुलीने जाऊ च्या घरी सांगितले कि ती मेन रोड वरून ३.३० वाजता घरी येत होती तेव्हा आरोपी विशाल बालबेल तिथे उभा होता त्याने तिला म्हटले कि ‚तू माझ्या सोबत शेतात चल मि तुला शेतातून फुल तोडून देतो ‚ पीडितेने त्याला नाही म्हटले तर आरोपीने पीडितेला जबरदस्तीने शेतात नेले, त्यानंतर आरोपी तिच्यासोबत जबरदस्ती करत होता तेव्हा पीडिता रडत होती तर आरोपीने तिला थापडा मारल्या व तिच्या वर जबरदस्तीने बलात्कार केला, तक्रार कर्ती ह्यांनी आरोपी विशाल ह्याला त्याच्या घरी जाऊन थापडा मारल्या आणि पीडितेला घेवून घटना स्थळी गेल्या सदर शेत त्यांच्या घरापासून दूर होते, आरोपी विशाल हा पीडितेला शेतात घेवून जात असताना एका व्यक्तीने पहिले होते, ह्या सर्व घटने चे तक्रार कर्ती ह्यांनी पोलीस स्टेशन बडनेरा येथें आरोपी विशाल बालबेल हयांच्या विरोधात १० वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची तक्रार नोंदीविले व पोलीस स्टेशन अधिकारी यांनी कलम पोकसो व अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अन्वये गुन्हा नोंदवून प्रकरण न्यायालयात दाखल केले. विषेश सत्र न्यायालय अमरावती हयांच्या समोर खटला चालवला, सदर प्रकरणात गुन्हा सिद्ध करण्याकरिता सरकारकडून एकूण ६ साक्षदारांना तपासले. त्यात पीडितेची आई तक्रार कर्ती, पीडिता, पीडितेची काकू, पंच, डॉक्टर आदी ना तपासले

सर्व साक्षीदारांचे जबाब पाहून प्रकरणातील सर्व दस्ताऐवज ची तपासणी करून सदर प्रकरणात विद्यमान विशेष सत्र न्यायालय ह्यांनी आरोपी विशाल बालबेल ह्यांना कलम ४ व६ पोकसोअंतर्गत २० वर्षाची सजा दि २९/८/२०२२ रोजी सुनवली होति. सदर प्रकरणात आरोपी विशाल ह्यांनी एड. सपना जाधव हयांच्या मार्फत सदरच्या न्याय निर्णय च्या विरुद्ध विद्यमान उच्च न्यायलाय नागपूर खंडपीठ हयांच्या समोर अपील दाखल केली व सदर प्रकरणात एड. सपना जाधव ह्यांनी सर्व साक्षदार हयांच्या साक्ष मध्ये तफावत असून पीडितेच्या संपूर्ण शरीरावर कुठेच जखम नसून आरोपी विशाल ह्यांचे पीडितेच्या मोठ्या चुलत बहिणी सोबत प्रेम संबंध होते. परंतु आरोपी हा गरीब घरातील असून साप पकडण्याचे कामकरीत होता म्हणून आरोपीचे संबंध तक्रारकर्ती व अन्य सर्वांना पसंद नव्हते. त्यातून वाद होता.

# देशात दहशतवाद व नक्षलवादाला बसला आळा

प्रतिनिधी ७ मार्च

♦ जिंदा शहीद मनिंदरजितसिंह बिट्टा यांचे मत

**अमरावती:** देशाला अनेक वर्षे दहशतवादाचा मोठा त्रास सहन करावा लागला. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची धुरा सांभाळल्यानंतर दहशतवाद व नक्षलवादावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवण्यात यश आले असल्याचे मत जिंदा शहीद मनिंदरजितसिंह बिट्टा यांनी व्यक्त केले.

स्थानिक जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे जिंदा शहीद मनिंदरजितसिंह बिट्टा यांची मिट द प्रेस आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी देशातील सध्याची परिस्थिती, दहशतवादी हल्ले, दहशतवाद्यांवर होत असलेली कारवाई आणि नक्षलवादी घटनांबाबत आपले विचार मांडले. ते म्हणाले की, पूर्वी देशात पंजाब,



जयपूर, मुंबई, दिल्ली आणि काश्मीरसह अनेक ठिकाणी दहशतवादी हल्ले होत होते. या हल्ल्यांमुळे देशात भीती आणि अस्थिरता निर्माण झाली होती. मात्र आता परिस्थितीत मोठा बदल झाला असून देशात शांतता निर्माण होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दहशतवादाविरोधात कठोर भूमिका घेण्यात आली आहे.

पुलवामा येथील हल्ल्यानंतर देशाने दहशतवाद्यांना ठोस उत्तर दिले. तसेच दहशतवादी कारवायांचे स्वरूप बदलले असले तरी सरकारने आपल्या यंत्रणांमार्फत त्यांच्यावर कठोर कारवाई केली आहे. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि छत्तीसगडसह अनेक राज्यांमध्ये नक्षलवादावर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, आपण स्वतः दहशतवादाचे बळी ठरलेलो आहोत. त्यामुळे अशा हल्ल्यांमुळे होणारे दुःख आपल्याला जवळून माहिती आहे. काही पीडित कुटुंबांना आपण मदतही केली असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी ज्येष्ठ -संपादक, जिल्हा मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष तसेच स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल उपस्थित होते. संचालन लोभस घडेकर यांनी केले. अनेक पत्रकारांनी एम. एस बिट्टा यांना प्रश्न विचारले.

## राज्याच्या अर्थसंकल्पावर मान्यवरांच्या प्रतिक्रिया

### राज्याच्या विकासासाठी चालना देणारा अर्थसंकल्प



महाराष्ट्राच्या २०२६ च्या अर्थसंकल्पातून स्व. अजित पवार यांचे दूरदृष्टीचे व्हिजन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामाच्या गतीचा प्रभावी संगम पाहायला मिळतो. कर्करोगावरील औषधे स्वस्त करून सरकारने संवेदनशीलतेचा परिचय दिला आहे, तर पायाभूत सुविधांवर दिलेला भर राज्याच्या दीर्घकालीन विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा करून सरकारने त्यांना मोठा दिलासा दिला आहे.
दरम्यान, या अर्थसंकल्पातील निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी अर्थव्यवस्थेला निश्चितच नवी उभारी मिळेल. महाराष्ट्र सरकारने सादर केलेला २०२६ चा अर्थसंकल्प राज्याच्या विकासाला गती देणारा आणि सर्व घटकांचा विचार करणारा आहे. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवक, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांसाठी केलेल्या तरतुदी स्वागतार्ह आहेत. ग्रामीण विकासासोबतच उद्योग व रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून दिसून येतो. त्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था अधिक बळकट होऊन सर्वसामान्य नागरिकांना याचा नक्कीच फायदा होईल, असा विश्वास आहे .

**सुनील खराटे**
भाजप, अमरावती

### महिला सक्षमीकरणासाठी सरकारची सकारात्मक भुमिका



राज्याचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात समाजातील विविध घटकांचा समतोल विचार करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून येते. विशेषतः आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा करण्यात आल्याने राज्यातील शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. त्याचप्रमाणे महिलांसाठी सुरू असलेली लाडकी बहीण योजना कायम ठेवण्याचा निर्णय घेतल्याने महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने सरकारची सकारात्मक भूमिका अधोरेखित झाली आहे.

या अर्थसंकल्पात ग्रामीण आणि शहरी भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला असून रस्ते, उद्योग, शिक्षण, आरोग्य तसेच इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढविण्याचा प्रयत्न दिसून येतो. त्यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळण्यास मदत होणार आहे.

एकूणच, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार करत राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी दिशा देणारा हा अर्थसंकल्प असल्याची भावना व्यक्त होत आहे. योग्य आणि प्रभावी अंमलबजावणी झाल्यास महाराष्ट्राच्या ग्रामीण तसेच शहरी अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**चंद्रशेखर भोयर**
अध्यक्ष, शिक्षक महासंघ,
महाराष्ट्र राज्य

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा



**अमरावती:** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शनिवार, दि. ७ मार्च रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात श्री. बावनकुळे हे सायन्सकोर मैदान येथे दुपारी १.३० वाजता जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय एकल महिला महासंमेलन आणि वैदर्भी जिल्हास्तरीय प्रदर्शनाला भेट देतील. त्यानंतर दुपारी ३ वाजता सांस्कृतिक भवन येथे अमरावती महानगरपालिका आणि एमएआयडीसी यांच्यातील सामंजस्य कराराप्रसंगी उपस्थित राहून त्यानंतर दुपारी ४ वाजता महिला मेळाव्यास मार्गदर्शन करतील. सायंकाळी ५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे राखीव राहिल. सायंकाळी ६ वाजता मोर्शी येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होईल. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता मोर्शी येथे दत्तापाटील गेडाम यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देतील.

## कौशल्य विकास केंद्राचा आज रोजगार मेळावा

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ‘पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे’चे शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. संत ज्ञानेश्वर सभागृह, मोर्शी रोड, अमरावती येथे हा मेळावा आयोजित काण्यात आला आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# दारूच्या नशेत धाकट्याने मोठ्या भावाची चाकू भोसकून केली हत्या

प्रतिनिधी ७ मार्च

♦ सुटाळा बुद्रूक येथील घटनाः आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**खामगाव :** शहरालगत असलेल्या सुटाळा बुद्रूक येथे कौटुंबिक वादातून धाकट्या मोठ्या मोठ्या भावाचा चाकूने भोसकून हत्या केल्याची संतापजनक घटना शुक्रवारी उघडकीस आली. किरकोळ कारणावरून पेटलेल्या वादाचे रूपांतर थेट रक्तरंजित हल्ल्यात झाल्याने संपूर्ण गाव हादरून गेले असून, परिसरात भीती व हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, देविदास महादेव गायकी (वय २८) असे मृतकाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांची आई लीला महादेव गायकी (वय ४३) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, आरोपी मंगेश महादेव गायकी (वय २५) याच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मृतक आणि आरोपी हे सख्खे भाऊ असल्याने या घटनेने परिसरात तीव्र संताप आणि खळबळ उडाली आहे. फिर्यादीनुसार, घटनेच्या दिवशी देविदास गायकी हा एका मित्रासह दारू पिऊन घरी आला होता. यावेळी आरोपी मंगेश याने मृतकाच्या मित्राला घरी जाण्यास सांगितले. या कारणावरून दोन्ही भावांमध्ये जोरदार वाद सुरू झाला.

वाद चिघळताच देविदास यांनी आरोपीच्या डोक्यावर हातातील कड्याने वार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या मंगेश ने घरात जाऊन चाकू आणला आणि देविदास यांच्या पोटावर सलग वार केल्याचा आरोप आहे. या प्राणघातक हल्ल्यात देविदास गंभीर जखमी झाले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

आरोपी मंगेश महादेव गायकी याला अटक करण्यात आली आहे. या घटनेनंतर सुटाळा बुद्रूक मध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १०३(१) व ३५२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक मंदार पुरी करीत आहेत. मृतकाच्या मित्राला घराबाहेर जाण्याचे सांगितल्याच्या कारणावरून या घटनेत सख्ख्या भावाचा बळी गेल्याने समाजमन हेलावले आहे.

# पहिल्या पत्नीचा पैशासाठी छळ करीत दुसरा विवाह; शेगाव पोलिसांत सहा जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी ७ मार्च

**खामगाव :** पहिल्या पत्नीला वारंवार पैशांची मागणी करून शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी तसेच कायदेशीर घटस्फोट न देता दूसरा विवाह केल्याच्या आरोपावरून शेगाव शहर पोलिस ठाण्यात ६ मार्च रोजी सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नुसरत जबीन मोहम्मद शारीक (४२, रा. आझादनगर, अळसणा रोड, शेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात मोहम्मद शारीक अब्दुल लतीफ (४५), शाहीन परवीन मोहम्मद शारीक (४५), इम्तियाज बी मोहम्मद शारीक (अंदाजे ५०, सर्व रा. इदगाह प्लॉट, शेगाव; सध्या घरकुल निवास, शेगावरोड, बाळापूर जि. अकोला), तसेच इबाद खान (अंदाजे ४०, रा. खामगाव), जुनेद खान (अंदाजे ५०) व इफतिखार काझी (५८, दोघेही रा. जुने शहर, बाळापूर जि. अकोला) यांच्यासह आणखी एका महिलेला आरोपी करण्यात आले आहे. फिर्यादीनुसार, आरोपी मोहम्मद शारीक यांनी फिर्यादीकडे वारंवार पैशांची मागणी करत तिला शारीरिक व मानसिक त्रास देत मारहाण केली. तसेच कुटुंबीयांनी तिच्या पतीचा शाहीन परवीन मोहम्मद शारीक हिच्यासोबत बाळापूर येथे नेऊन फिर्यादीला न सांगता त्यांचे लग्न लावून दिल्याचा आरोप आहे. फिर्यादीला कायदेशीर घटस्फोट न देता आरोपीने दुसरा विवाह केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी भारतीय न्यायसंहिता कलम ८५, ११५(२), ३५१(२)(३) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल संजय करुटले करत आहेत.

## चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीला अटक; ९४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**अकोला:** जुने शहर पोलिस स्टेशनच्या हद्दीत चोरी प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली. त्याच्याकडून सोन्याची पोथ व रोख असा ९४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्राप्त माहितीनुसार, २७ फेब्रुवारी २०२६ रोजी वाशीम बायपास कमला नगरातील फिर्यादी दिपमाला प्रकाश गोपनारायण यांनी जुने शहर पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अंदाजे ६ ग्रॅम वजनाची सोन्याची पोथ चोरीस गेली होती. या गुन्ह्याचा तपास करत असताना जुने शहर पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाला मिळालेल्या माहितीनुसार शोधमोहीम राबवली. त्यानुसार आरोपी आकाश अंबादास इंगळे याला ६ मार्च रोजी ताब्यात घेतले. आरोपीकडून चोरीस गेलेली सहा ग्रॅम सोन्याची पोथ तसेच रोख मिळून सुमारे ९४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जुने शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

## शिवर येथे शिवजयंती उत्साहात साजरी



**अकोला :** शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवर येथे तिथीनुसार छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी शिवर येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करण्यात आले. जेष्ठ शिवसैनिक गजानन मुरुमकार, शिवणीचे माजी सरपंच प्रवीण पातोडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मुकेश मुरुमकार, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार, विलास तवर, विलास मुंदोकार, शिवरच्या माजी सरपंच अर्चना मुरुमकार, कपिल मुरुमकार, संजय कातांगळे, उमेश मुरुमकार यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी शिवर गावकऱ्यांच्या वतीने शिवणी गावचे माजी सरपंच प्रवीण पातोडे यांच्या पत्नी उज्वलाताई पातोडे या अकोला महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १४ मधून प्रचंड मतांनी विजयी झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या अनुपस्थितीत हा सत्कार प्रवीण पातोडे यांनी स्विकारला. कार्यक्रमानंतर उपस्थितांना मोतीचूरच्या लाडूंचे वितरण करण्यात आले. जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषात आणि फटाक्यांच्या आतषबाजीने शिवर नगरी दुमदुमून गेली. या प्रसंगी शिवर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हातरूण, लोहारा भागात जेसीबीने अवैध वाळू उपसा

मेहंदी हसन ७ मार्च

**हातरूण:** बाळापूर तालुक्यातील लोहारा, जानोरी मेळ, काजीखेळ, नागद, सागत, सोनाळा, बोरगाव वैराळे, हातरुण आदी गावांच्या परिसरातील नदी व नाले पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू व माती उत्खनन सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. लोहारा जानोरी मेळ हाता नदी पात्रातून जेसीबी मशिनच्या साहाय्याने दिवसाढवळ्या उत्खनन सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. महसूल विभागाला गैरप्रकार दिसत नाही का अशी विचारणा होत आहे.

लोहारा नदी तीन भागांत विभागलेली असून, त्यापैकी केवळ पहिल्या भागाचा लिलाव झाल्याची माहिती आहे. दुसरा व तिसरा भाग लिलावाविना असतानाही पुलाजवळ मोठ्या प्रमाणावर वाळू उत्खनन सुरू आहे. दिवसाढवळ्या जेसीबीने वाळू काढली जात असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

तर जानोरी मेळ नदी दोन भागात आहे. एक बुलढाणा जिल्हा तर दुसरा भाग बाळापुर तालुक्यात आहे. बुलढाणा जिल्हयाच्या भागात लिलाव झलेला आहे.





### जानोरी मेळ नदीत अधिकारी पोहचताच माफियांचा पोबारा

बाळापुर भागात लिलाव झालेला नाही. पण वाळु उपसा दोन्ही भागात जेसीबीने मोठ्या प्रमाणात सुरू आहे. बाळापूर महसुल विभागाचे कर्मचारी यांना काही जानोरी मेळ नदीपात्रात कारवाई करण्यासाठी गेले असता वाळु माफिया वाहने घेवून फरार झाले. वाळु माफियांना माहिती देणारा कोण अशी चर्चा आहे.

सोनाळा परिसरात पूर्णा नदीकाठावर विटभट्ट्यांसाठी लागणारी माती मोठ्या प्रमाणात काढली जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. रॉयल्टी ३–४ ब्रास दाखवून प्रत्यक्षात ७–८ ब्रास माती भरली जात असल्याचा आरोप आहे. नियमांनुसार तीन फूटांपेक्षा अधिक खोलीपर्यंत उत्खननास परवानगी नसताना त्यापेक्षा खोल खोदकाम सुरू असल्याचे स्थानिकांनी सांगितले. लोहारा, निंबागाव व जानोरी मेळ परिसरातून रात्रंदिवस वाळू व मातीची वाहतूक सुरू असल्याचे दिसून येते.

निंबा फाटा चौकातून ही वाहतूक अकोला व आसपासच्या गावांकडे होत असल्याची माहिती आहे.

मागील पंधरा दिवसा पासून अवैध वाळु उपसा सुरू असल्याची माहिती मिळत आहे. संपूर्ण प्रकार कॅमेऱ्यात कैद झाल्याची सांगितले जात असले तरी अद्याप ठोस कारवाई न झाल्याने नागरिकामधे संभ्रम निर्माण झाला आहे. वाळु माफियांना कोणाचे पाठबळ आहे, असा सवाल केला जात आहे.

## खाटिक समाज भूषण डॉ. संतुजी लाड जयंती साजरी

प्रतिनिधी ७ मार्च

**आलेगाव :** येथील हिंदू खाटिक समाजाचे युवकांनी हिंदू खाटिक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड यांची जयंती साजरी केली असून डॉ संतुजी रामजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार उपस्थित मांवरांच्या हस्ते करण्यात आला. डॉ संतुजी रामजी लाड यांचा जन्म व १८४१ मध्ये झाला असून ते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रेरणेने कार्य करणारे एक थोर समाजसुधारक व नेते होते.त्यांनी सत्यशोधक समाज चळवळीत सक्रिय सहभाग घेत,विशेषता खाटिक धनगर समाजातील अज्ञान व अस्पृश्यता दूर करण्यासाठी मोलाचे कार्य केले.तसेच त्यांनी ठाणे व नाशिक भागामध्ये शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न केले.असे महान कार्य करणाऱ्या संतुजी लाड यांच्या कार्याची महती भावी पिढीना स्मरणात राहून त्यांनी केलेल्या कार्याला पुढे नेण्याची तयारी आजच्या पिढीने तेवत ठेवावी. व समाज सुधारणे मध्ये वाटा निर्माण करून सुसंस्कृत पिढी निर्माण होऊन सुदृढ भारत बनावा अशा भावना अनेकांनी डॉ संतुजी यांच्या जयंती दिनी व्यक्त केल्या.ह्या वेळी हिंदू खाटिक समाज बांधव व गावातील प्रतिष्ठित नागरिक व सहकारी मित्र मंडळ मोठ्या संख्येने हजर होते.



## ग्राम नवेगाव मध्ये घरगुती सिलेंडरचा स्पोट होऊन घराला आग

प्रतिनिधी ७ मार्च

**आलेगाव:** मौजे नवेगाव येथील प्रल्हाद परशराम डाखोरे वय वर्षे अंदाजे ५५ यांच्या घरातील गॅस सिलेंडरचा स्पोट होऊन घराला आग लागण्याची घटना दिनांक ६ रोजी दुपारी. १:३० वाजता दरम्यान घडली.

प्राप्त माहिती नुसार पातूर तालुक्यातील मौजे नवेगाव येथील रहिवासी प्रल्हाद परशराम डाखोरे वय वर्षे ५५ हे कुटुंबा सह मोल मजुरी करण्या हेतूने बाहेर गावी गेलेले आहेत. परंतु तेथील रहिवाशी रामकृष्ण कळनु खुळे,यांच्या घराचे बांधकाम सुरू असल्यामुळे,प्रल्हाद परशराम डाखोरे यांच्या घरामध्ये तात्पुरते रहिवाशी म्हणून राहत होते.दिनांक ६ रोजी दुपारी १:३० वाजता दरम्यान रामकृष्ण खुळे यांच्या पत्नी दळण दळुन आणण्यासाठी जवळच्या गिरणीमध्ये गेलेल्या असताणा घरामध्ये अच्यानक गॅस सिलेंडरचा स्पोट झाला. सदरील स्पोटामध्ये कुठलीही



### कुठलीही जीवित हानी नाही

जीवित हानी झाली नसली तरी घर जळून खाक झाले.आणि गावातील नागरिकांनी वेळीच आग विझवली असल्याची माहिती मौजे नवेगाच्या पोलिस पाटील सौ उर्मिला खुळे यांनी दिली.सिलेंडरचा स्पोट कशामुळे झाला हे कळाले नाही.तसेच तलाठी धनश्री भगत यांनी सदर घटनेचा वरिष्ठांकडे अहवाल सादर केल्याचे समजले.

## निधन वार्ता

### संजय कोल्हटकर



**अकोला :** स्टेट बँक कॉलनी गोरक्षण रोड येथील रहिवसी संजय वासुदेवराव कोल्हटकर (५५) यांचे ६ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी तसेच मोठा आप्त परिवार आहे.

## टाकळी खुर्दला शेतातील कुटार, चारा, टीन पत्रे जळून खाक

प्रतिनिधी ७ मार्च

**अकोट:** तालुक्यातील टाकळी खुर्द गावात शुक्रवार रात्री मोतीराम घाणखडे, गणेश मातुरकर, भिकाराम वाडी यांच्या कुटाराच्या गंज्या जळून खाक झाल्या. लोखंडी टीन पत्रे, लाकडी बल्ल्या, बैलगाड्या व इतरही सामान अचानक लागलेल्या आगीमुळे भस्मसात झाले.



आग विझवण्यासाठी गावातील ट्रॅक्टर, टँकरने पाणी भरून आणले व आगीवर नियंत्रण आणले. आगीचे स्वरूप पाहता उपसरपंच पती चंद्रशेखर गवळी यांनी अग्निशामक दलाला फोन लावून पाचारण केले. रात्री ९ वाजता अग्निशामक दलाने आगीवर तात्काळ नियंत्रण प्राप्त केले. यामुळे गावात वाढत्या आगीचा फैलाव तात्काळ कमी झाला. आगीचा पोलिसांनी तपास करावा. जेणेकरून अशा घटना वाढत्या उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये घडू नये. शेतकऱ्याच्या चाऱ्याचे नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी गावकरी करीत आहेत. यावेळी चंद्रशेखर गवळी, दीपक पाटकर ग्रा. स. अक्षय गवळी ग्रा. स. सुनील दामोदर, आशिष पाटकर, अंकुश ताडे, जमीर शहा, राजकुमार ताडे, संतोष चिलवंते, दिनेश घानखडे, अमोल घुये, मंगेश ताडे यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले.

## छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबीर अभियान

प्रतिनिधी ७ मार्च

**आपोती खुर्द :** राजस्व मंडळ घुसर येथील आपोती खुर्द येथे महसूली दाखले व इतर सेवा कॅम्प चे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात तहसीलदार कुणाल झाल्टे मंडळ अधिकारी नितीन शिंदे ग्राम महसूल अधिकारी सुबोध गावडे माणिक तायडे अमोल राठोड शंखे मॅडम पांडे घुगे मॅडम सरपंच वैभव तराळे पुरवठा विभाग नायब तहसीलदार विश्वजीत लिंगायत शंकरराव इंगळेया कार्यक्रमाला उपस्थित होते या कार्यक्रमात प्रलंबित फेरफार सातबारा मधील चुकीची दुरुस्ती



तुकडे बदी आणि पानांद रस्ते राशन कार्ड समधी निवारण उत्पन्न रहिवासी जातींचे प्रमाण पत्र वाटप इत्यादी कॅम्प आयोजन मध्ये हजर होते संजय गांधी आणि श्रावणबाळ याच्या समश्यांचे निराकरण व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले पी एम किसान विभाग पंचायत विभाग सेतू विभाग महसूल विभाग पुरवठा विभाग भूमी अभिलेख विभाग आरोग्य विभाग आधार कार्ड विभाग या राजस्व अभियानाचा ग्रामीण भागातील नागरिकांनी लाभ घेतला

## जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिर

प्रतिनिधी ७ मार्च

**अकोला:** जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषद अकोला येथे महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत महिला कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या आरोग्याची सर्वांगीण तपासणी करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालकल्याण) राजश्री कोलखेडे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्या नियोजनातून शिबिर राबविण्यात आले. या शिबिरात जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागांमध्ये कार्यरत महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.



तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सायली कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, औषधनिर्माता व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या टीमने औषध साठ्यासह तपासणी करून महिलांना आवश्यक उपचार व मार्गदर्शन केले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मुख्य लेखा अधिकारी माया शिर्के, पंचायत समिती अकोल्याच्या गटविकास अधिकारी श्रीमती पटोकर, इंगळे तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. बडगे यांसह महिला व बालकल्याण विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राजश्री कोलखेडे यांनी सांगितले की, महिलांच्या आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात असून त्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि महिलांना आरोग्याची भेट देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी डॉ. बळीराम गाढवे म्हणाले की, सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे सकस आहाराची कमतरता व शारीरिक हालचाली कमी झाल्याने असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढत आहे. प्रदूषण व रासायनिक घटकांच्या वापरामुळेही आरोग्यावर परिणाम होत आहे. कुटुंब आणि नोकरीच्या जबाबदाऱ्यांमुळे अनेक महिला स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे अशा शिबिरांद्वारे महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

## अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवार यांच्या वाट्याला द्यावा

प्रतिनिधी ७ मार्च

### जावेद जकारिया यांचे निवेदन

**अकोला :** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ यंदा होणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवार यांच्या वाट्याला घेण्यात यावा, अशी मागणी प्रदेश संघटक सचिव जावेद जकारिया यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघामध्ये अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या पाच जिल्ह्यांचा समावेश असून हा मतदारसंघ अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. शिक्षक वर्गामध्ये राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवार यांच्याबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून पक्षाची संघटनात्मक ताकदही या विभागात सातत्याने वाढत असल्याचे जावेद जकारिया यांनी निवेदनात नमूद केले आहे.

महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाच्या चर्चेदरम्यान अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवार यांच्या वाट्याला देण्यात यावा आणि या मतदारसंघासाठी पक्षाचा अधिकृत उमेदवार जाहीर करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

योग्य नियोजन, मजबूत संघटन आणि शिक्षक वर्गाचा वाढता पाठिंबा लक्षात घेता हा मतदारसंघ जिंकण्याची पूर्ण क्षमता पक्षामध्ये असल्याचा विश्वास जावेद जकारिया यांनी व्यक्त केला आहे. तसेच या संदर्भात पक्ष नेतृत्वाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

## ऋषी महाराज संस्थानचा जिर्णोद्धार करा

प्रतिनिधी ७ मार्च

**हिवरखेड:** येथील काही अंतरावर येत असलेल्या धबधबा खारसा म्हणून ओळखले जात असलेले हे धार्मिक निसर्गरम्य ठिकाण असलेले संत ऋषी महाराज संस्थान आहे, या संस्थानाचा जिर्णोद्धार व्हावा अशी मागणी भाविकांन कडून केली जात आहे, येणाऱ्या पिढीला या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सहलीचे योग यावे, या ठिकाणी ऋषी पंचमीला यात्रा महोत्सव व्हावा, या ठिकाणी पिण्याचे पाण्याचे जलशुद्धीकरण व्हावे, लग्न कार्यासाठी मोठे सभागृह व्हावे मंदिराचा जिर्णोद्धार व्हावा अशी मागणी ऋषी महाराजांचे भक्त मोठ्या प्रमाणात करीत आहेत, ऋषी महाराज आजही भाविकांनी पावतात अशी भाविकांची व्याख्यायीता आहे.

### भाविकांची मागणी



या ऋषी महाराज संस्थांनवर आमची ऋषी महाराज सेवा समिती प्रत्येक ऋषी पंचमी साजरी करीत असते, या संस्थानला शासनाच्या वतीने प्रसिद्ध पर्यटनाचा दर्जा प्राप्त झाला तर या संस्थानाची प्रगती होईल?.
**अनिल कराळे,**
(ऋषी महाराज सेवा समिती हिवरखेड सदस्य)

आम्ही आमदार निधीतून जे काही या संस्थांनच्या विकासाठी योग्य होईल ते प्रयत्न करू, भाविकांची मागणी रेटून धरू .
**संदीप इंगळे ,**
(माजी सरपंच हिवरखेड)

येथे येणाऱ्या जाणाऱ्या भाविकांची बसण्याउठण्याची सोय व्हावी , येथे हात पंप व्हावा, हे एक जागृत संस्थान आहे, येथे ऋषी महाराजांचा नेहमी सहवास असतो.
**प्रभाकर जाधव**
(भाविक हिवरखेड)

# उमरखेड-विडूळ मार्गावर प्रवासी ऑटो पलटी; तिघे जखमी

प्रतिनिधी ७ मार्च

**उमरखेड :** उमरखेड ते विडूळ मार्गावर तीन चाकी प्रवासी ऑटो पलटी होऊन झालेल्या अपघातात तीन प्रवासी जखमी झाल्याची घटना गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली. शहरापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर हा अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, ढाणकीकडून उमरखेडकडे प्रवासी घेऊन येत असलेला तीन चाकी अ‍ॅपे ऑटो चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अनियंत्रित झाला. त्यानंतर ऑटो रस्त्याच्या कडेला असलेल्या



काटेरी झुडपात जाऊन पलटी झाला. या अपघातात ऑटोतील तीन प्रवासी गंभीर जखमी झाले असून काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाल्याची माहिती आहे. अपघातानंतर जखमींना स्थानिकांच्या मदतीने उपचारासाठी हलविण्यात आले. वृत्त लिहीपर्यंत या घटनेबाबत पोलिसांत कोणतीही तक्रार दाखल झाली नव्हती. त्यामुळे जखमी प्रवाशांची नावे समजू शकली नाहीत.

दरम्यान, सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने प्रवासी मिळेल त्या वाहनाने प्रवास करत असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी प्रवाशांनी खचाखच भरलेली वाहने वेगाने धावताना दिसतात. मात्र अशा वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांची प्रभावी कारवाई दिसून येत नसल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# नेर येथे दुसरे वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलन

प्रतिनिधी ७ मार्च



| अध्यक्ष | उद्घाटक | स्वागताध्यक्ष | मुख्य निमंत्रक |
| --- | --- | --- | --- |
| प्रा. डॉ. रेखा मेश्राम<br>संपादक - रमाई मासिक, औरंगाबाद | मा. ज.वि. पवार<br>संस्थापक सदस्य, दलित पँथर | मा. इंदिरा तलवारे<br>यवतमाळ | मा. वनिता शरद मोरे<br>नेर |

**यवतमाळ :** सावित्रीबाई फुले स्मृतिदिन (१० मार्च), जागतिक महिला दिन (८ मार्च) आणि प्रा. सतेश्वर मोरे स्मृतिदिन (२ मार्च) यानिमित्ताने दुसरे वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलनाचे आयोजन नेर येथे रविवार, ८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता निर्मल बन्सी लॉनमध्ये केले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रेखा मेश्राम तर उद्घाटक म्हणून ज. वि. पवार (संस्थापक सदस्य, दलित पँथर) उपस्थित राहणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून वनिता शरद मोरे, कांता अहिरे, पुरुषोत्तम तलवारे, पपिता पाटील, सुषमा पाखरे, डॉ. कीर्तिराज लोणारे, रामदास वीर, प्रा. डॉ. राजू इंगोले आदि मान्यवर उपस्थित राहणार आहे. संमेलनात विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान समारंभ होणार आहे. चित्रकलेतील राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्राचार्य योगिता चिंचोळे, प्रा. डॉ. विक्रींत मेश्राम, डॉ. प्रा. सुजाता वानखडे, डॉ. पूजा गायकवाड, डॉ. किरण गायकवाड, डॉ. स्मिता चौधरी, पल्लवी मेश्राम, दिशा घरडे, चारु नन्नावरे यांचा समावेश आहे.


परिसंवाद सत्र 'भारतीय स्त्री आणि आजचे वास्तव व उपाय' या विषयावर होईल. अध्यक्षस्थानी सुनंदा बोधिले राहणार आहे. तर अनंत भवरे (छ. संभाजीनगर), प्रा. डॉ. चित्रा म्हात्रे (मुंबई), रमा घरडे (अमरावती), धम्मा कांबळे (यवतमाळ), प्रा. डॉ. सुनंदा वालदे (यवतमाळ) आदि वक्ते सहभागी होतील. त्यानंतर कविसंमेलन होणार असून, प्रा. संजय घरडे, दिगंबर झाडे, पुष्पा बोरकर, विलास थोरात, गिरीष खोब्रागडे यांसह इतर कवी आपल्या कविता सादर करतील.

कार्यक्रमाचे संचालन संजय मोकळे, प्रा. दीपाली गवई करतील. समारोप प्रा. डॉ. रेखा मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली होईल, तर ठराव वाचन राजेश पाटील करतील. या ऐतिहासिक संमेलनात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य संयोजक डॉ. शरद मोरे, महादेवराव घरडे आणि आयोजन समितीने केले आहे.

# विकसित महाराष्ट्राचा सर्वसमावेशक 'संकल्प' : पालकमंत्री संजय राठोड

प्रतिनिधी ७ मार्च

**यवतमाळ :** विधानसभेत आज सादर झालेला अर्थसंकल्प हा महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी तसेच लाडक्या बहिणींच्या आणि युवक, बेरोजगारांच्या कल्याणासाठीचा एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे. 'महायुती' सरकारने दिलेल्या वचनांची पूर्तता करत सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद आणि समृद्धी नांदवण्यासाठीचे हे एक भक्कम पाऊल आहे. हा विकसित महाराष्ट्राचा सर्वसमावेशक संकल्प आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड



यांनी दिली.

राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्याला कर्जमुक्त करून त्याच्या घरात आनंद आणण्याचे जे वचन दिले होते, ते आज पूर्णत्वास येत आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजने'द्वारे दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी आणि नियमित परतफेडीसाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान हे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी उचललेले ऐतिहासिक पाऊल आहे.

महायुती सरकार दीर्घकालीन आणि अल्पकालीन अशा दोन्ही मार्गांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. आमचे नेते एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सुरू झालेली लाडकी बहीण कधीही बंद पडणार नाही हेही स्पष्ट झाले. उलट या योजनेचे बळकटीकरण आणि विस्तार करून राज्यातील महिलांना अधिक स्वावलंबी बनवविण्याच्या दृष्टीने आज महत्वाचे पाऊल टाकण्यात आले. आज सादर झालेला हा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या दूरदृष्टीचे फळ आहे. शेती, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांना मिळालेली चालना महाराष्ट्राला विकासाच्या नवीन शिखरावर घेऊन जाईल. हा अर्थसंकल्प प्रगतीच्या नव्या युगाकडे नेणारा आहे. महायुती सरकार हे 'बोलणारं नाही, तर करून दाखवणारं सरकार' आहे, याची प्रचिती आजच्या अर्थसंकल्पातून पुन्हा एकदा आली आहे. मी या जनहितकारी अर्थसंकल्पाचे मनःपूर्वक स्वागत आणि अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रिया पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी ७ मार्च

**झरी जामणी :** जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या वतीने प्रशासन लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर (टप्पा-१)' या विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या सेवा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या शिबिरामध्ये नागरिकांना प्रमाणपत्रे, दाखले, जमीन अभिलेख अद्ययावत करणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांची प्रशासकीय कामे सुलभ व जलदगतीने पूर्ण करण्यास मदत होणार आहे.

शिबिरामध्ये उपलब्ध होणाऱ्या प्रमुख सेवा प्रमाणपत्रे व दाखले : प्रलंबित फेरफार प्रकरणे, ७/१२ मधील चुका दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ उतारे वाटप, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र, विद्यार्थ्यांसाठी दाखले. जमीन अभिलेख अद्ययावत : अकृषिक (NA) तरतुदीबाबत मार्गदर्शन, नवीन व्यवस्थापन संमती प्रक्रियेची माहिती, तुकडेबंदी उल्लंघन प्रकरणांचा निपटारा, भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणांबाबत मार्गदर्शन.

सरकारी योजनांचा लाभ : सामाजिक अर्थसहाय्य, विविध योजनांचे मंजुरी प्रस्ताव, घरांसाठी पट्टे वाटप, ई-मोजणी अर्ज, अ‍ॅग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी. **तालुक्यातील शिबिराचे वेळापत्रक :** ७ मार्च २०२६ – शिरला, १४ मार्च २०२६ – खडकोड, १७ एप्रिल २०२६ – मुकुटबन, ८ मे २०२६ – माथार्जुन, १५ मे २०२६ – झरी जामणी. तालुक्यातील सर्व नागरिकांनी आपल्या मंडळातील ठरलेल्या दिवशी उपस्थित राहून विविध शासकीय योजनांचा व महसुली सेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# एपस्टीन प्रकरणाविरोधात 'निषेध रॅली'; नराधमांना फाशीची मागणी

प्रतिनिधी ७ मार्च

**यवतमाळ :** जागतिक स्तरावर खळबळ उडवणाऱ्या जेफ्री एपस्टीन बालशोषण आणि मानवी तस्करी प्रकरणातील अमानवीय सत्य समोर आल्यानंतर, यवतमाळमध्ये याचा तीव्र पडसाद उमटला आहे. प्रभावशाली गुन्हेगारांना आंतरराष्ट्रीय स्तरावर कठोर शिक्षा व्हावी आणि पीडित मुलींना न्याय मिळावा, या मागणीसाठी जागतिक महिला दिन (८ मार्च) रोजी शहरात भव्य निषेध रॅली काढण्यात येणार आहे. समस्त महिला संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने ही रॅली



आयोजित करण्यात आली असून, "उत्सव नव्हे, अन्यायाविरुद्धचा लढा" असा संदेश यातून दिला जाणार आहे.

रॅलीचा कार्यक्रम आणि मार्ग

रविवारी दुपारी ठीक ४ वाजता समता मैदान येथून सुरू होणारी ही रॅली शहराच्या मुख्य मार्गांवरून मार्गक्रमण करत संविधान चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ विसर्जित होईल. या ठिकाणी निदर्शने करून जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून केंद्र सरकार आणि संयुक्त राष्ट्र संघाला (UN) विशेष निवेदन सादर केले जाणार आहे.

**प्रमुख मागण्या :** एपस्टीन प्रकरणातील प्रत्येक गुन्हेगाराला, मग तो कितीही प्रभावशाली असला तरी, मृत्यूदंडाची शिक्षा व्हावी.

बालशोषणाविरुद्धचे कायदे अधिक कडक करून जागतिक स्तरावर त्यांची अंमलबजावणी व्हावी.


इराण-इस्रायल संघर्षात इराणमधील शाळेवर झालेल्या हल्ल्यात १६० हून अधिक निष्पाप मुलींच्या मृत्यूचा तीव्र निषेध नोंदवला जाणार आहे. "जगाला युद्धाची नव्हे, बुद्धाची गरज आहे," असा संदेश या रॅलीतून दिला जाईल.

आयोजकांनी नागरिकांना निषेधाचे प्रतीक म्हणून काळे वस्त्र परिधान करणे किंवा हाताला काळी फीत बांधण्याचे आवाहन केले आहे. "अन्याय कुठेही झाला तरी तो मानवतेविरुद्धचा गुन्हा आहे. बालतस्करी आणि शोषणाविरुद्धच्या या लढ्यात यवतमाळच्या माता-भगिनींनी आणि जागरूक पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे," असे आवाहन अ‍ॅड. सीमा लोखंडे, आयोजक, समस्त महिला संघटना, यवतमाळ यांनी केले आहे. शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत अ‍ॅड. सीमा लोखंडे, प्रमोदिनी रामटेके, पल्लवी रामटेके, वैशाली हिरे, ज्योती जीवने, स्वाती दराने, स्नेह डोंगरे, कृष्णा पुस्णाके आदी उपस्थित होते. त्यांनी यवतमाळकरांना या अन्यायाविरुद्ध एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

प्रतिनिधी ७ मार्च

**उमरखेड :** नागरिकांच्या महसूल आणि विविध शासकीय योजनांशी संबंधित अडचणी त्वरित मार्गी लावण्यासाठी उमरखेड तालुक्यात शासनाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' हे विशेष अभियान ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. शिबिराच्या सात दिवसापूर्वी नागरिकांनी अर्ज किंवा तक्रार संबंधित विभागात दाखल करावीत, जेणेकरून शिबिराच्या दिवशी त्वरित समाधान मिळवता येईल, अशी माहिती उपविभागीय महसूल अधिकारी सखाराम मुळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



■ उमरखेड शहरातील जवळपास १६,००० नागरिकांना प्रॉपर्टी कार्डचे वितरण १५ मे रोजी शिबिरामध्ये करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून रखडलेली ही मागणी या शिबिराद्वारे पूर्णत्वाला येणार आहे, आणि नागरिकांना लवकरच महा राजस्व अभियानात समाधान मिळणार आहे.

यावेळी तहसीलदार राजेश सुरडकर आणि नगर परिषद मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे उपस्थित होते. सखाराम मुळे म्हणाले की, शासनाने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी या योजनेचा जीआर काढला असला तरी नागरिकांमध्ये अपेक्षित जनजागृती झालेली नाही. त्यामुळे तालुक्यातील विविध मंडळांमध्ये शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात मंडळनिहाय कॅम्प आयोजित होणार असून, ७/१२ उतारा, फेरफार, वारस नोंद, रेशन कार्ड, निराधार योजना, श्रावणबाळ योजना आदी महसूल विषयक प्रकरणांवर त्वरित मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय कृषी, महसूल, पंचायत समिती, वन, आरोग्य इत्यादी विभागांच्या योजनांबाबतही नागरिकांचे प्रश्न सोडवले जातील.

शिबिरात जनजागृतीसाठी शालेय पथनाट्य, भजनी मंडळांचे कार्यक्रम तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन ठेवले जाईल. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून शासनाच्या या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी केले.

**मंडळनिहाय शिबिरांचे वेळापत्रक**

- कुपटी – ७ मार्च
- निगुणूर – १४ मार्च
- दराटी – २४ मार्च
- मुळावा – १ एप्रिल
- विडूळ – १० एप्रिल
- चातारी – १७ एप्रिल
- ढाणकी – २९ एप्रिल
- बिटरगाव – ८ मे
- उमरखेड (शहरी भाग) – १५ मे

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त "अस्मिता महिला" लीग स्पर्धा

प्रतिनिधी ७ मार्च

**यवतमाळ :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रविवारी दि. 8 मार्चला सकाळी 7 वाजता नेहरु स्टेडीअम, गोधणी रोड, यवतमाळ येथे अस्मिता महिला" लीग स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

ही स्पर्धा केंद्र सरकारच्या मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम विभाग यवतमाळ, खेलो इंडिआ, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट व गाईड कार्यालय, एनसीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.

महिला दिनानिमित्त वयोगट 13 वर्ष, 13 ते 18 व 18 ते 29 या वयोगटातील युवती करीता 100 मिटर, 200 मिटर, 400 मिटर दौड स्पर्धा व मनोरंजनात्मक स्पर्धेचे आयोजन खास युवती करीता करण्यात आलेले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याकरीता अस्मिता पोर्टलवर आपले रजिष्ट्रेशन करणे अनिवार्य असून ज्यांनी रजिष्ट्रेशन केले आहे त्यांना या स्पर्धे मध्ये सहभागी होवून पोर्टल व्दारे आपले प्रमाणपत्र सुध्दा डाऊनलोड करता येणार आहे. त्याकरिता https://nses.kheloindia.gov.in किंवा https://mybharat.gov.in या लिंकवर जाऊन आपली नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या स्पर्धेमध्ये शाळा, महाविद्यालय, क्रीडा असोसिएशन, युवा मंडळ, महिला मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट गाईड, एनसीसी व इतर संस्थाच्या महिला युवती नोंदणी करुन सहभागी होवू शकतात. विजेता स्पर्धकास मेडल व प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

यवतमाळ मधील सर्व खेडाळू, शालेय तसेच महाविद्यालयातील युवतींनी या स्पर्धेत जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

# नाफेडचे पाच चना खरेदी केंद्र सुरु

प्रतिनिधी ७ मार्च

**यवतमाळ :** खरीप पणन हंगामांतर्गत आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत चना खरेदीसाठी नाफेडमार्फत जिल्ह्यातील महागाव, पांढरकवडा, पाटण, पुसद व आर्णी या पाच ठिकाणी खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. खरेदी केंद्रांमध्ये तालुका खरेदी विक्री संघ मर्या. महागांव, तालुका खरेदी विक्री संघ मर्या. पांढरकवडा, बळीराजा फळे फुले भाजीपाला कृषी उत्पादन पणन व प्रक्रिया सहकारी संस्था मर्या.पाटण, पुसद तालुक्यात किसान मार्केट यार्ड शेलु (बु), पुसद व शेतकरी कृषी खाजगी बाजार दत्तरामपुर, आर्णी या केंद्रांचा समावेश आहे. जिल्ह्यातील चना खरेदी ही 29 एप्रिलपर्यंत करण्यात येणार असून चना खरेदीकरिता ऑनलाईन नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी आधारकार्ड, 7/12 उतारा, पिकपेरा व बँकेचे पासबुकची झेरॉक्स प्रत ही आवश्यक कागदपत्रे संबंधित खरेदी केंद्रावर स्वत: हजर राहून नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी प्र. विजय गाढवे यांनी केले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत विशेष शिबिरांचा धडाका

प्रतिनिधी ७ मार्च

**महागाव :** सामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागले नसावे आणि त्यांच्या तक्रारींना त्वरित वाचा फुटावी, यासाठी महागाव प्रशासनाने विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. यवतमाळ जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत महागाव तालुक्यात 'विशेष सेवा शिबिरांचा' धडाका सुरू होणार असून, प्रत्येक महसूल मंडळात एकाच ठिकाणी विविध विभागांचे प्रतिनिधी उपलब्ध असतील. यामुळे नागरिकांना शासकीय कामे सुलभपणे आणि वेगाने करता येतील.



५ मार्च रोजी महागाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी या शिबिराच्या उद्देशाबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, "सध्या सुरू असलेल्या महाराजस्व अभियानामुळे नागरिकांना विविध टेबलवर जाऊन कामं करत बसण्याची गरज उरणार नाही. महसूल, निवडणुक, कृषी, पंचायत विभाग यांसारखे महत्त्वाचे विभाग एकाच ठिकाणी उपलब्ध असतील."

विशेष सेवा शिबिरात सातबारा उताऱ्यातील त्रुटी, फेरफार, दुरुस्ती, जातीचे, उत्पन्नाचे आणि अन्य दाखल्यांबाबतचे प्रलंबित प्रश्न त्वरित सोडवले जातील. यासोबतच, संजय गांधी निराधार योजना अंतर्गत नवीन अर्ज, पेन्शन संदर्भातील अडचणी, मतदार यादीतील तक्रारी, फळबाग लागवड, कृषी यांत्रिकीकरण आणि शेतकऱ्यांसाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती देखील थेट पोहोचवली जाईल. घरकुलाचे निधी न मिळणे, नवीन अर्जांची स्थिती आणि अतिक्रमित जागेवरील घरकुलांचे तांत्रिक प्रश्नही शिबिरामध्ये सोडवले जातील. यावेळी सखाराम मुळे यांनी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, "स्थानिक पातळीवरच प्रश्न सोडवणे हेच आमचे मुख्य उद्देश आहे. प्रशासन आपल्या समस्या सोडवण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे."

■ शिबिरांचे आयोजन मंडळानुसार होणार असून, यामध्ये ७ मार्च २०२६ रोजी हिवरा (संगम) येथून सुरुवात होईल. १४ मार्च २०२६ रोजी काळी (दौ), १ एप्रिल २०२६ रोजी कासोळा, १० एप्रिल २०२६ रोजी गुंज, १७ एप्रिल २०२६ रोजी मोरठ, ८ मे २०२६ रोजी फुलसावंगी, आणि १५ मे २०२६ रोजी महागाव येथे शिबिराची सांगता होईल.

■ प्रशासनाने या उपक्रमाची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया, वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांची मदत घेतली आहे. यामुळे महागाव तालुक्यातील हजारो लाभार्थ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# महागाव नगरपंचायतीच्या विषय समित्यांत शिवसेना (उबाठा)चा दबदबा

प्रतिनिधी ७ मार्च

**महागाव :** महागाव नगरपंचायतीच्या विषय समित्यांच्या निवडीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने बाजी मारत महत्त्वाच्या समित्यांवर वर्चस्व प्रस्थापित केले. नियोजन, बांधकाम आणि आरोग्य समित्यांवर या गटाचा झेंडा फडकला असून काँग्रेसच्या बंडखोर नगरसेवकांना मात्र एकाही समितीवर स्थान मिळाले नाही.

नगराध्यक्षपदी भाजपच्या रंजना आडे यांची बहुमताने निवड झाल्यानंतर गुरुवारी (५ मार्च) नगरपंचायत सभागृहात विषय समित्यांची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये स्थायी समिती अध्यक्षपदी नगराध्यक्ष रंजना आडे, नियोजन समिती अध्यक्षपदी उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे, बांधकाम



समिती सभापतीपदी विशाल पांडे, पाणीपुरवठा समिती सभापतीपदी सुरेश पाटील नरवाडे आणि आरोग्य समिती सभापतीपदी सौ. सुनिता शिवाजी डाखोरे यांची निवड करण्यात आली.

नगराध्यक्ष निवडीत भाजपला शिवसेना (उबाठा) गटासह काँग्रेसच्या बंडखोर नगरसेवकांचा पाठिंबा मिळाला होता.

त्यामुळे विषय समित्यांमध्ये बंडखोर नगरसेवकांना संधी मिळेल, अशी चर्चा होती. मात्र अंतिम क्षणी शिवसेना (उबाठा) गटाने तीन महत्त्वाच्या समित्यांवर आपला प्रभाव कायम ठेवत राजकीय समीकरणे आपल्या बाजूने वळविल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

या वेळी मुख्याधिकारी अजय कुरवाडे, नगराध्यक्ष रंजना आडे, उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. दरम्यान, भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी आमदार विजय खडसे, शहराध्यक्ष निलेश नरवाडे, माजी तालुकाध्यक्ष दिपक आडे, फुलसावंगी मंडळ अध्यक्ष योगेश वाजपेयी आणि स्वीकृत नगरसेवक सुजित ठाकूर यांनी नवनियुक्त सभापतींचे अभिनंदन केले.








## सिग्नल जोडले, अद्यापही नाही पडले, सुरू करण्याचे घोडे कुठे अडले...


# सुरू होण्यापूर्वीच पोल 'सडले'!

● अतिष देशमुख @ वाशीम ●

मागील तीन वर्षापासून वाशीम शहरातील मुख्य चौकासह गर्दीच्या ठिकाणी वाशीम नगर पालिका प्रशासनाने सिग्नल चे काम करण्यासाठी श्री गणेशा केला होता. सिग्नलचे काम पुर्ण झाले सिग्नल लागलेही मात्र सिग्नल व्यवस्था अद्यापही सुरूच झाली नाही. त्यामुळे सिग्नल व्यवस्थेच्या कार्यप्रणालीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे सिटी न्युज सुरपफास्टने वृत्त मालिका चालविली. त्याची दखल प्रशासनाने घेत सिग्नलचे पोल व लाईट बसविले आहेत. या पोलवर गोल सिग्नलचे दिवे सुरू असून सिग्नल जोडले असले तरी प्रत्यक्षात मात्र सिग्नल व्यवस्था सुरूच झाली नाही. नगर प्रशासन व ट्रॉफिक पोलिस प्रशासनाच्या नियोजनाअभावी सिग्नल व्यवस्था अद्यापही बंदच आहे. तीन वर्षापासून दिखावा म्हणून भ्रष्टाचारासाठी उभे केले सिग्नलचे पोल सिग्नलचे दिवे न लागताच सडत आहेत. सिग्नल व्यवस्था पुर्ण करून नगर प्रशासनाने सिग्नल व्यवस्था शहर वाहतुक शाखेकडे सुपूर्द केल्याचे नगर पालिका प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र शहर वाहतूक व नगर प्रशासनाच्या या वादात व भ्रष्टाचारात अडकलेले सिग्नलचे पोल सिग्नल सुरू होण्यापूर्वीच जागच्या जागीच सडत आहेत.



वाशीम शहराची वाढती लोकसंख्या, तसेच शहरातील प्रमुख चौकामध्ये होणारी दररोजची वाहतुक कोंडी लक्षात घेवून नगरपालिका प्रशासनाने दोन वर्षापूर्वी वाशीम शहरातील प्रमुख चौकामध्ये वाहतूक नियंत्रण करण्यासाठी सिग्नल व्यवस्थेचा श्रीगणेशा केला होता. परंतु ही व्यवस्था अद्यापही शहरात सुरू झाली नसल्याने वाशीम शहरातील नेहमी गर्दीने फुलून जाणारे जुना रिसोड नाका, पाटणी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पुसद नाका, पोलिस स्टेशन चौक, पोस्ट ऑफीस चौक, अकोला नाका, हिंगोली नाका, रेल्वे गेट परिसरामध्ये दररोज वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे. वाशीम पालिका प्रशासनाने शहरामध्ये सिग्नल व्यवस्था सुरू करण्यासाठी ज्या कंत्राटदाराला या कामाचे कंत्राट दिलेले आहे. या सिग्नलच्या कामातच लाखो रूपयांचा भ्रष्टाचार झाला असून भ्रष्टाचारामुळेच तीन वर्षापासून अद्यापही सिग्नल लागलेच नाही. सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्तानंतर ट्रॉफिक सिग्नलचे पोल व लाईट लावण्यात आले आहेत.



### ट्रॉफिक सिग्नलचे दिवेही बंद अन् व्यवस्थाही बंद

वाहतुक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी शहरात सिग्नलचे सुविधा करण्यात आली. मात्र या सुविधेसाठी लाखो रूपये खर्च करून शहर वासियांना काहीच उपायोग होत नाही. शहरात वाहतुक कोंडी होत असतांना दिखावा म्हणून सिग्नलचे पोल उभे असून त्यावरील दिवे बंद आहेत. व व्यवस्थाही बंद आहे. मात्र ट्राफिक सुरळीत करणारी सिग्नल व्यवस्था बंद आहे.



शहरातील ट्रॉफीक व्यवस्था शहर वाहतुक शाखेकडे सुपूर्द करण्यात आली. ही सिग्नल व्यवस्था काही काळ वाहतुक सुरळीत करण्यासाठी वापरण्यात येते. सिग्नल सुविधा सुरू करण्यासाठी सिटी न्युज सुपरफास्टने वृत्त मालिका चालवून पाठपुरावा केला. सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्तानंतर ट्रॉफिक सिग्नलचे पोल व लाईट लावण्यात आले आहेत. अद्यापही मात्र ते सिग्नल बंद असल्याने शोभेची वस्तु बनले आहे.

---

## थोडक्यात

### महाराष्ट्र राज्यातील शेतकरी बांधवांना बळ देणारा अर्थसंकल्प

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



महाराष्ट्र राज्यातील शेतकरी बांधवांना या अर्थसंकल्पामध्ये कर्जमाफी तसेच विदर्भातील शेतकऱ्यांकरिता जलसंजीवनी ठरणारा शेतकरी बांधवांचा जीवनमान उंचावणारा अत्यंत महत्त्वाचा वैनगंगा नळगंगा प्रकल्पाकरिता आपल्या देवेंद्र फडणवीस सरकारने तब्बल ९४.१६८ कोटी रुपयाची आर्थिक तरतूद अर्थसंकल्पात केली, ज्यामुळे विदर्भातील यवतमाळ, अकोला ,बुलढाणा, वाशिम, अमरावती ,सह विदर्भातील असंख्य शेतकरी बांधवांना त्यांची शेती या प्रकल्पाद्वारे सिंचनाखाली येणार आहे ,ज्यामुळे शेतकरी बांधवाचा जीवनमान उंचावणार आहे, व शेतकरी बांधवांना शाश्वत सिंचन मधून आपली समृद्ध शेती करता येणार आहे, या अर्थसंकल्पामध्ये आपल्या राज्य सरकारने नदीजोड प्रकल्पाकरिता अर्थसंकल्पामध्ये केलेली आर्थिक तरतूद म्हणजेच विदर्भातील शेतकऱ्यांना कर्जमाफी सहा खूप मोठे बळ मिळेल त्यामुळे शेतकरी बांधवांना व विदर्भातील ग्रामीण महाराष्ट्राला हा अर्थसंकल्प म्हणजे नवीन उभारी देणारा अर्थसंकल्प ठरणार

**लखनसिंग ठाकूर** ,भाजपा
उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेश सचिव महाराष्ट्र राज्य

### जिल्ह्याची आर्थिक प्रगतीची दमदार झेप

**वाशीम :** महाराष्ट्रातील जिल्हानिहाय नाममात्र सकल जिल्हा देशांतर्गत उत्पादन (जीडीडीपी) वाढ दराच्या आकडेवारीनुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात वाशिम जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात दुसरे स्थान पटकावले आहे. सन २०२३-२४ च्या तुलनेत जिल्ह्याने २१.० टक्के वाढ दर नोंदविला असून ही वाढ राज्यातील बहुतांश जिल्ह्यांच्या सरासरी वाढीपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक आहे. त्यामुळे वाशिम जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीची राज्यस्तरावर दखल घेतली जात आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार राज्यात सर्वाधिक वाढ बुलढाणा जिल्ह्यात २२.६ टक्के नोंदविण्यात आली असून त्यानंतर वाशिम जिल्हा २१.० टक्के वाढीसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.

---

## ग्रामसेवकाचे स्व-दान, खोट्या प्रमाणपत्रातून लाटले अनुदान !

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

*** ग्राम सेवक दिपक रोकडे यांने खोटे लाटला अपंग भत्ता**
*** गेल्या ११ वर्षापासून लाटत आहे अपंगाचे वेतन व भत्ता**
*** गटविकास अधिकारी यांनी ग्रामसेवकाची केली पाठराखण**

ग्राम सेवक दिपक पुंडलिक रोकडे हे ग्राम पंचायत लाडेगांव येथे सचिव या पदावर सध्या कार्यरत असून त्याने गेल्या ११ वर्षापासून स्वतः अपंग असल्याबाबतचे खोटे प्रमाणपत्र लावून शासनाची दिशाभूल करुन आपल्या पगारामध्ये वेतन व अपंग भत्ता याचा आर्थिक लाभ घेतला आहे. पगरामध्ये आर्थिक लाभ घेवून शासनाचे लाखो रुपये लाटले आहे याबाबतची तक्रार दिनांक २६/९/२०२५ रोजी करण्यात आली होती तेव्हापासून आतापर्यंत हे प्रकरण गटविकास अधिकारी पुनम राणे याच्याकडून थंड बस्त्यांमध्ये ठेवण्यात आले. ग्रामसेवक दीपक रोकडे हा दि.१३/०८/२०१४ रोजी जवाहर पंचायत समिती जि. पालघर येथे दिव्यांगाचे खोटे प्रमाणपत्र लावून प्रथम रुजू झाला होता. त्यानंतर ते दि.३०/०४/ २०२१ रोजी कारंजा पंचायत समिती अंतर्गत रुजू आहे. कारंजा पंचायत समितीमध्ये सुध्दा मागील ४ वर्षापासून शासनाची दिशाभूल करुन शासनाचे लाखो रुपये गडप करत आहे. त्यामुळे त्यांच्या फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांना निलंबित करुन कारवाई करण्यात तक्रारदारांनी केली होती.



परंतु कारंजा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी पुनम राणे मॅडम यांनी थातुर मातुर कारवाई करून प्रकरण निकाली काढण्याचा प्रयत्न केला या प्रकरणामध्ये आर्थिक व्यवहार झाल्याचे सुद्धा बोलल्या जात आहे. दीपक रोकडे नावाच्या या ग्रामसेवकांनी अपंगाचे खोटे प्रमाणपत्र लावून शासनाची दिशाभूल करून अपंगाचा वेतन भत्ता लाटला, अपंगाचे प्रमाणपत्र त्याच्याजवळ आली कुठून कोणत्या डॉक्टरने त्याला अपंगाचे प्रमाणपत्र दिले याची सविस्तर चौकशी झाली पाहिजे त्यामुळे जिल्ह्यामधील असे अनेक प्रकार उघडकीस येऊ शकतात तेव्हा या प्रकरणाची जि.प?.मुख्याधिकारी यांनी सखोल चौकशी करून संबंधित ग्रामसेवकाला निलंबित करून त्याच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे जेणेकरून अश्या प्रकारास आळा बसेल.

---

## पद्मश्री पुरस्कार प्राप्त बोथे गुरुजींचा भाजप जिल्हाध्यक्ष चितलांगे यांच्या हस्ते सत्कार



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तालुक्यातील जन्मगाव गोगरी येथील वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे निजी सचिव तथा अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोझरी सरचिटणीस श्री जनार्दन पंत बोथे गुरुजी यांना नुकताच भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार दिल्याबद्दल भाजपा जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी गोगरी येथे सुरू असलेल्या श्रीमद ग्रामगीता भागवत ज्ञानयज्ञ च्या निमित्ताने गुरुजींचा आदरपूर्वक सत्कार केला. प्रसंगी विनोद पाटील जाधव, मनोज राऊत, महादेव विश्वकर्मा, नंदू भुजाडे उपस्थित होते. शुभेच्छा देताना चितलांगे यांनी गुरुजींना म्हटले की हा आपला सत्कार नसून आपल्या समर्पित जीवनाच्या कार्य व कर्तुत्वाची पावती आहे तेव्हा गुरुजींनी म्हटलं की हा माझा एकट्याचा सत्कार नसून अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्याचा सत्कार आहे.

---

## शेलुबाजार परिसरात गावागावात अवैध धंद्याना उधाण

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



अवैध दारूविक्रीसह आता परिसरात जुगार, मटका व्यवसायालाही तेजी आल्याचे चित्र दिसून येत आहे. गावागावात मटका घेणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने वरिष्ठांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी आता नागरिकांतून केल्या जात आहे. वरळी मटका घेणाऱ्यात आता युवक उतरले असून, याची चैन लांबलचक असल्याचे सांगितले जाते.

एका रुपयाला १० रुपये देणारा हा व्यवसाय लपून, छपून चालत होता. ओपन टू क्लोजमध्ये खेळला जाणारा हा एक प्रकारचा जुगार संसार उद्धवस्त करणारा ठरत आहे. मागील काही महिन्यांपासून गावागावातील चौकात बसून या व्यवसायाची खुलेआम सट्टापट्टी बनविली जात आहे. यात सट्टा लावणाऱ्याची संख्या मोठी आहे. सट्टयाचे आकडे मोबाईलवर पाहायला मिळत असल्याने या व्यवसायात विश्वास आहे. पण, यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर येत असले तरीही हा व्यवसाय नगदी व उधारीवर चालत असल्याचे सांगितले जाते. एका गावात २०/२५ व्यक्ती हा व्यवसाय करीत असल्या तरी एखाद्या व्यक्तिला पोलीस टार्गेट करीत आहेत. इतरांना मुभा दिली जात असल्याचे वास्तव आहे. मात्र, यात मोठे मासे सहभागी असल्याची चर्चा आहे. रोज मजुरी देऊन सट्टापट्टी घेण्यास युवकांना यात रोजगार दिला जात आहे. यावर आळा बसणार नाही, हे सर्वसामान्य नागरिकांना माहिती आहे. मात्र, अवैध व्यवसायावर आळा बसविण्यास असलेली यंत्रणा कमी पडते आहे, की अर्थपूर्ण संबंधातून याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हा संशोधनाचा विषय ठरत आहे.

---

### निर्गुणाताई इंगळे परभणीकर यांच्या सुमधुर वाणीतून...

## पिंपरी सरहद येथे रंगली महाशिवपुराण कथा !

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●





दरवर्षीप्रमाणे यावर्षीही तुकाराम बीज निमित्त पिंपरी सरहद येथे महाशिवपुराण कथेचे भक्तिमय आयोजन करण्यात आले होते. या कथेचा शुभारंभ २६ फेब्रुवारी रोजी झाला असून ५ मार्च रोजी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सुप्रसिद्ध शिवपुराण कथा प्रवक्त्या ह.भ.प. भागवताचार्य निर्गुणाताई इंगळे (परभणीकर) यांच्या सुमधुर वाणीतून ही कथा रंगली. त्यांच्या ओघवत्या आणि भावपूर्ण निरुपणामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

या कथेच्या वेळी संगीताचीही सुरेख साथ लाभली. गायनाचार्य ह.भ.प. नंदाताई सोनार यांनी गायनाची सेवा दिली. ह.भ.प. श्रीरंग गोविंदराव नरवाडे (गुंज, ता. वसमत) यांनी सिंथ वादनाची साथ दिली, तर ह.भ.प. शिवम महाराज हादगावकर यांनी तबलावादनाची सेवा बजावली. २६ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या शिवपुराण कथेचा गावातील लहान-थोर, महिला व पुरुष मंडळींनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. कथेदरम्यान भक्तिगीतांवर महिला, वृद्ध व तरुणांनी ठेका धरत भक्तिमय वातावरण अनुभवले. कथा सुरू असताना ग्रामस्थांच्या वतीने चहापाण्याचीही व्यवस्था करण्यात आली होती. ४ मार्च रोजी शिवपुराण गाथेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ठिकठिकाणी कथा प्रवक्त्या निर्गुणाताई इंगळे यांचे ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात आले. प्रभात फेरी काढल्यानंतर विठ्ठल मंदिरासमोर तिचा समारोप करण्यात आला. या शिवपुराण कथेच्या दरम्यान शिरपूर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार वाघ साहेब यांनीही भेट देत कथेचा लाभ घेतला. यावेळी त्यांच्यासोबत बीड जमादार वानखेडे ब्राह्मण उपस्थित होते. तसेच केनवड येथील विठ्ठलराव केनवडकर व भारत महाराज कराळे यांनीही या शिवपुराण कथेच्या ठिकाणी भेट देऊन आयोजकांना शुभेच्छा दिल्या. या शिवपुराण महाकथेमुळे पिंप्री सरहद गावात भक्तिमय व आनंदमय वातावरण निर्माण झाले होते.

---

## काळीपिवळीच्या धडकेत एक ठार!

*** डोणगावचे शरद जाधव यांचा दुर्दैवी मृत्यू * नशिबाने साथ दिली एकदाष्ठ दुसऱ्यांदा हरले दाजीबा**

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

पिंपरी सरहद्द पासून जवळच असलेला मेहकर तालुक्यातील डोणगाव येथे दाजीबा म्हणून ओळख असणारे शरद जाधवांची ओळख. डोणगाव सासुरवाडी असल्याने गावातील युवकांसह ग्रामस्थ शरद जाधव यांना प्रेमाने दाजीबा म्हणून हाक मारायचे. शांत, मनमिळाऊ व सुस्वभावी म्हणून परिसरात त्यांची ओळख होती. काही महिन्यांपूर्वी झालेल्या अपघातातून त्यांनी जीव वाचवला होता; मात्र नियतीने दुसऱ्याच अपघातातून त्यांना कायमचे हिरावून नेले. भरधाव काळीपिवळी टॅक्सीने उडविल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम पिंपरी सरहद्द येथील बळीराजा पेट्रोल पंपाजवळ ५ मार्च रोजी सकाळी सुमारे ९ वाजता हा भीषण अपघात घडला. डोणगाव येथील शरद गणपतराव जाधव (वय ५५) हे दुचाकीने मालेगावकडे जात होते. पेट्रोल पंपावर पेट्रोल भरून ते बाहेर निघत असताना मालेगावकडून डोणगावकडे येणाऱ्या भरधाव काळीपिवळी टॅक्सीने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी जबर होती की जाधव गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात येत होते; मात्र उपचारासाठी नेत असतानाच रस्त्यात त्यांची प्राणज्योत मालवली. या अपघातात त्यांच्यासोबत असलेली एक व्यक्ती गंभीर जखमी झाली असून तिच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. शरद जाधव हे डोणगावचे जावई असल्यामुळे मागील काही वर्षांपासून ते येथेच स्थायिक झाले होते. सुस्वभावी व सर्वांशी मिळून मिसळून राहणाऱ्या दाजीबा यांचा गावात मोठा मित्रपरिवार होता. त्यामुळे त्यांच्या अचानक झालेल्या निधनाची बातमी समजताच डोणगाव व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे १२ ऑक्टोबर २०२५ रोजी डोणगाव येथील अतिया पेट्रोल पंपासमोर झालेल्या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. त्या अपघातात जाकीर शाह मिस्त्री यांचा मृत्यू झाला होता, तर जाधव यांचे दोन्ही पाय मोडले होते. त्यानंतर दीर्घकाळ उपचार घेतल्यानंतर मागील पंधरा ते वीस दिवसांपासून ते हळूहळू चालू लागले होते. मात्र नियतीने पुन्हा एकदा क्रूर खेळ केला. पहिल्या जीवघेण्या अपघातातून बचावलेले दाजीबा दुसऱ्या अपघातात मात्र मृत्यूच्या कवेत गेले. त्यांच्या निधनाने डोणगाव परिसरात शोककळा पसरली असून ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.



---

### अखिल भारतीय प्रेरणा उत्सवासाठी

## दिशा जोगदंडची निवड

**महाराष्ट्रातील केवळ २ विद्यार्थ्यांचा समावेश**

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेवर आधारित प्रेरणा उत्सवासाठी स्थानिक श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्या निकेतनची विद्यार्थीनी दिशा विजय जोगदंड हिची निवड करण्यात आली आहे. या उपक्रमात महाराष्ट्रातील केवळ २ विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे येथे उल्लेखनीय आहे.

प्रेरणा उत्सव हा प्रामुख्याने शिक्षण आणि कौशल्य विकासावर केंद्रीत असलेला अनुभवात्मक शिक्षण कार्यक्रम आहे. हा उपक्रम भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत राबविण्यात येत असून यामध्ये शालेय विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्यावर भर दिला जातो. यासाठी प्रथम जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात येतात. सत्र २०२५-२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धेत श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्या निकेतनची विद्यार्थीनी दिशा विजय जोगदंड हिने प्रथम स्थान प्राप्त केले आहे. महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी दिशाची निवड आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जन्मगाव असलेल्या गुजरात येथील वडनगर होणाऱ्या ८ दिवशीय प्रशिक्षणासाठी झाली आहे.



या प्रशिक्षणासाठी राज्यातील केवळ २ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून यामध्ये वाशीम जिल्ह्यातील श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्या निकेतनची विद्यार्थीनी दिशा जोगदंड हिचा समावेश आहे. दिशाने आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई वडीलांसह श्री बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड सुरेंदकुमार बाकलीवाल, मुख्याध्यापक धनंजय वानखेडे, शिक्षक विनायक उज्जैनकर, मनिष सदाफळे, ज्ञानेश्वर वाकुडकर, शुभम गोटे, मयुरी डहाळे, रोहिणी ठोके, रोशनी अंभोरे, मोहीनी अहाळे, संतोष फुरसुले, प्रफुल्ल काळे, लक्ष्मण भगिरथे, आकाश भगिरथे यांना दिले आहे. दिशा जोगदंड ही आता पुढील प्रशिक्षणासाठी ९ एप्रिल रोजी वडनगर येथे शिक्षिका मोहीनी अहाळे यांच्यासह रवाना होणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. ७ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# परिस्थिती बिकट, मुश्किल झाले मिळणे रेल्वेचे तिकीट !

## ◆ मे महिन्यात प्रवास करणे कठीण

प्रतिनिधी ७ मार्च

**अकोला :** जर तुम्ही उन्हाळी सुट्टी साजरी करण्यासाठी किंवा एखाद्या नातेवाईकाच्या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी मे महिन्यात रेल्वे प्रवासाचे नियोजन करत असाल तर सावध रहा. आधी मे महिन्यातील तिकिटांची रेल्वे बुकिंग विंडो १२० दिवस(४ महिने)आधी उघडताच व्हायची. आता ६० दिवसाच्या बुकिंगच्या पहिल्या सहा दिवसांत, अकोला मार्गे जाणाऱ्या प्रमुख गाड्यांवर 'नो रूम' आणि 'रिग्रेट' चे बोर्ड दिसू लागले आहेत.

आझाद हिंद आणि हमसफरच्या एसी डब्यांचे कोच फूल

रेल्वे नियमांनुसार, रेल्वे सुटण्याच्या १२० दिवस आधी आरक्षण सुरू होते. मे महिना हा शालेय सुट्ट्या आणि विवाह समारोहांचा हंगाम आहे, त्यामुळे प्रवाशांनी पहिल्या दिवसापासूनच बुकिंग करण्यासाठी गर्दी केली आहे. रेल्वे तिकिटासाठी तासनतास लाईन मध्ये उभे राहिल्यावर सुद्धा कन्फर्म तिकीट मिळत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी पाहावयास मिळत आहे. शाळांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या नंतर पुणे मार्गावर आझाद हिंद आणि हमसफर गाड्यांमध्ये विद्यार्थ्यांची गर्दी वाढत आहे.



प्रमुख मार्गांवर परिस्थिती: पुणे आणि मुंबईसाठी लांब रांगा

अकोला ते पुणे, मुंबई आणि कोलकाता या व्यस्त मार्गांवर सर्वाधिक प्रवासी प्रवास करतात . त्यामुळे परिस्थिती अशी आहे की मार्च संपण्यापूर्वी अनेक गाड्यांमध्ये जागा मिळणे अशक्य होऊ शकते. २२१४२ हमसफर एक्सप्रेस (नागपूर-पुणे) या गाड्यांमध्ये तिकिटे उपलब्ध नाहीत. ११०४० महाराष्ट्र एक्सप्रेस (गोंदिया-कोल्हापूर) वर प्रतीक्षा यादी आहे आणि १२१०६ विदर्भ एक्सप्रेस (नागपूर-मुंबई स्लीपर) मध्ये प्रतीक्षा यादी मोठी आहे. १८०३० शालीमार-एलटीटी शालीमार-मुंबई स्लीपर मध्ये रिग्रेट ची परिस्थिती निर्माण झाली आहे. अकोल्याहून धावणाऱ्या अनेक सुपरफास्ट गाड्यांचे एसी डबे जवळजवळ फुल झाले आहेत. त्यामुळे मार्च अखेरीस बुकिंग बंद होण्याची स्थिती येऊ शकते. रेल्वे सूत्रांवर विश्वास ठेवायचा झाला तर, ज्या गतीने रिझर्वेशन होत आहे, मे महिन्यातील जवळजवळ सर्व प्रमुख गाड्या मार्च अखेरीस रिग्रेट (बुकिंग बंद) च्या परिस्थितीला सामोरे जाऊ शकतात. अशा परिस्थितीत, प्रवाशांकडे आता फक्त तत्काळ किंवा रेल्वेने जाहीर केलेल्या उन्हाळी विशेष गाड्यांचा पर्याय उरणार आहे.

# प्रतिष्ठित बिल्डर सुनील इन्नानी यांच्या गळ्यात नगरसेवक पदाची माळ

## ◆ प्रकाश आंबेडकरांचा मोठा निर्णय माहेश्वरी समाजाला प्रतिनिधित्व

प्रतिनिधी ७ मार्च



**अकोला :** महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवक पदासाठी वंचित बहुजन आघाडीकडून अनेक नावांची चर्चा सुरू असतानाच, ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सर्वांना धक्का देत एका माहेश्वरी समाजातील नावाला पसंती दिली आहे.

अकोल्यातील प्रसिद्ध उद्योजक आणि 'नरेडको'चे संस्थापक अध्यक्ष सुनील इन्नानी यांचे नाव निश्चित करण्यात आले असून, वंचितने या निवडीद्वारे शहराच्या विकासाचे आणि सामाजिक संतुलनाचे नवे समीकरण मांडले आहे. इतकेच नाही तर अकोल्याच्या टाउन प्लॅनिंग विस्तारात त्यांची भूमिका आणि योगदान महत्वाचे राहणार आहे.सुनील इन्नानी यांच्या निवडीमुळे अकोल्याच्या नागरी प्रश्नांना तांत्रिक आणि व्यावसायिक दृष्टीकोनातून न्याय मिळेल, असा विश्वास वंचितच्या गोटातून व्यक्त होत आहे.

सुनील इन्नानी हे केवळ एक नाव नसून अकोल्याच्या रिअल इस्टेट क्षेत्रातील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर सारख्या छोट्या गावातून अकोल्यात स्थायिक होऊन त्यांनी आपले साम्राज्य उभे केले.


त्यांनी 'मार्वल ट्रिनिटी रिअल इस्टेट एलएलपी' या संस्थेची स्थापना केली. अकोल्यातील आधुनिक वास्तुकलेचा नमुना असलेले यमुना आर्केड, यमुना बिझनेस पार्क, यमुना टॉवर-१ व २, त्रिमूर्ती टॉवर आणि लँडमार्क बिल्डिंगचे ते निर्माते आहेत. बांधकाम क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील 'नरेडको' या संघटनेच्या अकोला युनिटचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत.ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सुनील इन्नानी यांची निवड करून केवळ एका उद्योजकाला संधी दिली नाही, तर अकोल्यातील व्यापारी आणि मध्यमवर्गीय वर्गाला पक्षाशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. माहेश्वरी मसाजाला साद घालण्याचा प्रयत्न केला गेला आहे. सामाजिक समीकरणांची अचूक गुंफण करत वंचितने विकासाचा 'चेहरा' समोर आणला आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# नारेडको महाराष्ट्राच्या व्यवस्थापन समिती संयुक्त सचिव पदी अकोल्याचे पंकज कोठारी

## ◆ पंकज कोठारी यांची नियुक्ती अकोला व विदर्भासाठी गौरवाची बाब

प्रतिनिधी ७ मार्च

**अकोला :** देशातील रिअल इस्टेट क्षेत्रातील अग्रगण्य व प्रभावी संस्था असलेल्या नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल नारेडको महाराष्ट्रच्या व्यवस्थापन समितीवर अकोल्यातील उद्योजक, चार्टर्ड सिव्हिल इंजिनिअर व बांधकाम क्षेत्रातील अनुभवी बिल्डर, विकासक पंकज रमेशचंद्र कोठारी यांची संयुक्त सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नारेडको महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रशांत शर्मा, माजी अध्यक्ष राजन बांदेलकर तसेच चेअरमन एमेरिटस डॉ. निरंजन हिरानंदानी यांच्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्र जयपूर येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात आले.



नारेडको ही संस्था भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या हाऊसिंग अँड अर्बन अफेअरच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेली रिअल इस्टेट क्षेत्रातील एक प्रमुख राष्ट्रीय संघटना आहे. देशभरातील सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील रिअल इस्टेट विकासक, बांधकाम व्यावसायिक, गुंतवणूकदार तसेच संबंधित उद्योगक्षेत्रातील विविध घटकांना एकत्र आणून या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी नारेडको कार्य करते. सध्या नारेडकोच्या राष्ट्रीय, राज्य आणि शहर स्तरावर मिळून देशभरात दहा हजारांहून अधिक सदस्य कार्यरत आहेत.

कोरोनानंतर भारतात वेगाने वाढत असलेले शहरीकरण, पायाभूत सुविधा विकास आणि गृहनिर्माण क्षेत्रातील गुंतवणूक यामुळे रिअल इस्टेट क्षेत्रात मोठी वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर उद्योगक्षेत्र, शासन आणि विविध हितधारक यांच्यात समन्वय साधत बांधकाम क्षेत्रातील समस्या, धोरणात्मक मुद्दे आणि विकासाच्या संधी यावर नारेडको सक्रियपणे काम करत आहे.

अशा महत्त्वाच्या संस्थेच्या राज्यस्तरीय व्यवस्थापन समितीवर पंकज कोठारी यांची नियुक्ती होणे हे अकोला व विदर्भासाठी अभिमानास्पद मानले जात आहे. त्यांच्या अनुभवाचा उपयोग राज्यातील तसेच विदर्भातील रिअल इस्टेट क्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात होईल, असा विश्वास नारेडकोच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

पंकज कोठारी हे अकोल्यातील नामांकित उद्योजक, चार्टर्ड सिव्हिल इंजिनिअर, बिल्डर, मार्गदर्शक व व्यवस्थापन सल्लागार असून रिअल इस्टेट, पायाभूत सुविधा, गृहनिर्माण, पर्यटन, माहिती तंत्रज्ञान व शिक्षण या विविध क्षेत्रांत त्यांना जवळपास ३८ वर्षांचा समृद्ध अनुभव आहे. त्यांनी अनेक सामाजिक, व्यावसायिक व उद्योग संघटनांमध्ये सक्रिय भूमिका बजावत विविध विकासात्मक उपक्रमांना चालना दिली आहे. ते नारेडको अकोलाचे संस्थापक सदस्य असून राष्ट्रीय पातळीवर बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांना संघटित करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे विदर्भातील रिअल इस्टेट क्षेत्रातील प्रश्न राज्य व केंद्र शासनाच्या स्तरावर प्रभावीपणे मांडले जातील तसेच या क्षेत्राच्या शाश्वत विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पंकज कोठारी यांच्या नियुक्तीबद्दल अकोला शहरातील उद्योग, व्यापार व बांधकाम क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बार्शीटाकळी येथील एस. के. गोल्डन ज्युबिली कॉन्व्हेंटमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन



प्रतिनिधी ७ मार्च

**अकोला :** शिक्षण क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या येथील एस. के. गोल्डन ज्युबिली कॉन्व्हेंट तर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रविवार, १ मार्च रोजी बार्शीटाकळी येथील श्री खोलेश्वर संस्थान हॉल मध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सर्वश्री शाम धाईत, रमेश वाटमारे, गजानन वाटमारे, भारत बोबडे, बी. एम. इंगळे (केंद्रीय राखीव पोलीस दल) आणि पोलीस जमादार एन. एम. मोरे आदि मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, त्यानंतर शाळेच्या वतीने सर्व पाहुण्यांचे सहर्ष स्वागत करण्यात आले.

### विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आविष्कार

◆यावेळी विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यामध्ये प्रामुख्याने देशभक्तीपर गीते, कोळीगीत आणि खंडोबाची भक्तीगीते फिल्मी गीते आणि भांगडा सादर केला. विविध गाण्यांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार नृत्यांनी पालकांची आणि नागरिकांची वाहवा मिळवली. ?मुख्याध्यापिका अनिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळा नेहमीच तत्पर असते. केवळ अभ्यासच नव्हे, तर त्यांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी वनभ्रमंती आणि काटेपूर्णा धरणासारख्या प्रेक्षणीय स्थळांच्या सहलींचे आयोजनही केले जाते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एस. के. कॉन्वेंटचे शिक्षक शुभांगी गजानन पाटील, गौरव दिलीप राऊत, प्रिया संदीप काळे, संदीप संजय बोबडे, शिवानी गणपतराव सातव आणि जीवन दिगंबरराव भुंबरे यांनी अथक परिश्रम घेतले. उपस्थित सर्व पालकांनी आणि नागरिकांनी या सुंदर उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

# अकोल्यातील फर्निचर मॉलवर 'जीएसटी'ची कारवाई

प्रतिनिधी ७ मार्च

**अकोला :** जठारपेठेतील एका फर्निचर मॉलवर जीएसटी विभागाने अचानक धाड टाकली. या कारवाईमुळे शहरातील व्यापारी वर्तुळात खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, जीएसटी विभागाच्या विशेष पथकाने कोणतीही पूर्वसूचना न देता मॉलमध्ये प्रवेश करून कागदपत्रांची छाननी सुरू केली, आर्थिक व्यवहारांमध्ये तसेच कर भरण्यात तफावत असल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आल्याचे समजते.

# मोर्णा नदीतील वाढलेली जलकुंभी काढण्याची मोहीम सुरू

## महापौर शारदा खेडकर यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ

प्रतिनिधी ७ मार्च



**अकोला :** शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या मोर्णा नदीत मोठ्या प्रमाणात वाढलेल्या जलकुंभीमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला होता. तसेच नागरिकांकडून वारंवार जलकुंभी काढण्याची मागणी होत होती. या पार्श्वभूमीवर अकोला महानगरपालिकेकडून मोर्णा नदीतील जलकुंभी काढण्याच्या कामाला आजपासून सुरुवात करण्यात आली आहे.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातून वाहणाऱ्या मोर्णा नदीमध्ये गेल्या काही दिवसांपासून जलकुंभी मोठ्या प्रमाणात वाढली होती. त्यामुळे नदीचे पाणी अडथळले जात होते आणि डासांच्या प्रादुर्भावातही वाढ होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात होती. नागरिकांची ही मागणी लक्षात घेता महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर आणि स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या निर्देशानुसार आज ६ मार्चपासून मोर्णा नदीतील जलकुंभी काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली.या कामाचा शुभारंभ महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर, महानगर अध्यक्ष तथा नगरसेवक जयंत मसने, उपमहापौर अमोल गोगे, शहर सुधार आघाडीचे गटनेते पवन महल्ले, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ. आरतीताई घोगलिया, माजी उपमहापौर तथा नगरसेविका सौ. वैशालीताई शेळके, नगरसेविका सौ. उषाताई वीर्क, मंजुषाताई शेळके, ?ड. कल्पना गोटफोडे आणि नगरसेवक नितीन ताकवाले यांच्या हस्ते हार अर्पण करून आणि नारळ फोडून करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते रणजीत खेडकर, संजय गोटफोडे, दीप मनवानी, सतीष मिरजामले यांच्यासह शहर सुधार आघाडीचे पदाधिकारी तसेच मोटार वाहन विभाग प्रमुख अनिल बिडवे, शाम गाढे आदी उपस्थित होते.

# प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आता एसटी चालक-वाहकांची मद्यपान तपासणी सक्तीची

प्रतिनिधी ७ मार्च

**अकोला :** प्रवाशांच्या सेवेसाठी या ब्रीदवाक्यावर राज्य परिवहन महामंडळाचा कारभार चालतो. सुरक्षित प्रवास करण्यासाठी प्रवाशांचा सर्वाधिक भरवसा राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसेस वर आहे. परंतु गेल्या काही वर्षात महामंडळात कार्यरत चालक व वाहक दारूच्या नशेत आढळून आल्याने अनेकदा प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. दारू पिऊन गाडी चालविल्याने महामंडळाच्या काही बसेसचा अपघात सुद्धा झाला आहे. त्यामुळे आता कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मद्यपानास आळा घालण्यासह प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) घेतला आहे. या अंतर्गत आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालक-वाहकांची मद्य तपासणी यंत्राद्वारे( ब्रिथ एनालायझर) दररोज तपासणी केली जाणार आहे. योग्य नोंदी घेऊनच कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर पाठविण्यात येणार आहे. कारण मुंबईतील परळ बसस्थानकाला २५ जानेवारी रोजी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी अचानक भेट दिली होती. या वेळी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये मद्याच्या बाटल्या आढळल्या होत्या. याची गंभीर दखल घेत परिवहनमंत्र्यांनी तातडीने चौकशी समिती नेमून कारवाईचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर उपाययोजना करण्यासही सांगितले होते. त्यामुळे आता एसटीच्या चालक आणि वाहकांच्या दारू पिण्याच्या सवयीवर अंकुश लागेल आणि प्रवाशांचा प्रवास सुद्धा सुखरूप होण्यास निश्चितच मदत होईल.



# राष्ट्रीय विद्यापीठ महिला बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झालेले 10 पैकी 8 खेळाडू अकोल्याचे




प्रतिनिधी ७ मार्च

**अकोला :** लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी जालंधरला आयोजित ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी महिला बॉक्सिंग राष्ट्रीय स्पर्धेसाठी अकोल्यातील ८ खेळाडूंची निवड झाली आहे.

०८ ते १४ मार्च दरम्यान होणा-या स्पर्धेत ४८ किलो वजनगटात ऋणाली डोंगरे, ५७ किलो वजनगटात पलक झांबरे, ६० किलो वजनगटात रेवती उंबरकर, ६५ किलो वजनगटात रितिका बोस,७० किलो वजनगटात गायत्री माटे,७५ किलो वजनगटात गौरी मुरूमकार, ८० किलो वजनगटात कंचन सुरांसे, ८०+किलो वरील वजनगटात पूर्वा गावंडे ह्या सर्व खेळाडू ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बॉक्सिंग चॅम्पियनशिप मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील. संघासोबत संघ व्यवस्थापक डॉ.गणेश पोटे तर क्रीडा मार्गदर्शक म्हणून बॉक्सिंग प्रशिक्षक गजानन कबीर राहतील. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ निवड समितीचे अध्यक्ष गजानन बडे यांच्या मार्गदर्शनात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संघाचे प्रशिक्षण शिबीर झाले. सर्व खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग प्रशिक्षक सतीशचंद्र भट्ट यांचे मार्गदर्शन लाभले.

# लिनेस क्लब कडून महापौर, नगरसेविकांचा सत्कार




प्रतिनिधी ७ मार्च

**अकोला :** 'लिनेस क्लब ऑफ अकोला'च्या वतीने शुक्रवारी महानगरपालिकेत जाऊन महापौर शारदाताई खेडकर, नगरसेविका उषाताई विरक, आरती घोगलिया, कल्पना घोरपडे, मंजुषा शेळके, सुनीता अग्रवाल व चंदा शर्मा यांचा शाल, श्रीफळ, भेटवस्तू आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सन्मान हा केवळ एक प्रतीक आहे, खरा सत्कार तर त्यांच्याबद्दल आमच्या मनात असलेल्या श्रद्धेमध्ये आहे अशी भावना लिनेस क्लबच्या पदाधिका-यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लिनेस क्लबच्या प्रांताध्यक्षा लि. कल्पनाताई देशमुख, रीजन चेअरपर्सन ममता सूर्या, अध्यक्षा राजेश्री समनपुरे, पी.डी.पी. हरविंदरकौर सेठी, लि. तारा माहेश्वरी, लि. आशा विरवानी, लि. सुनंदा गुप्ता, लि. सुलेखा गुप्ता, सचिव लि. वनिता बिजवे, कोषाध्यक्षा लि. अलका उमाळे, लि. रत्नमाला रुईकर यांचा सहभाग होता.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135